

अर्घ्य

डॉ. सुहास पेठे

।। श्री ।।

अर्घ्य

(ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून
केलेल्या प्रातिनिधिक कृती, काही कथांच्या रूपानं)

डॉ. सुहास पेठे

एम्.ए.,पीएच्.डी.(तत्त्वज्ञान)

अर्घ्य
पुस्तकरूपाने प्रकाशित दुसरी आवृत्ती : जुलै २०१९
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :

वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

हे परमेश्वरा,

तुझ्या
असंख्य जीवनदायी दानांतून
दिलेले हे कथारूप विचारांचे
अल्प 'अर्घ्य'

कृतज्ञ भावानं अर्पण...

अर्घ्य

कथानुक्रम

१.	अर्घ्य	.. ७
२.	प्रगतीचा पहिला क्षण	..२२
३.	एक आगळी संध्याकाळ!	..३०
४.	उच्च शिक्षण..?	..५५
५.	आजचं 'वीर'चक्र..?	..६१
६.	आवाज : दुर्लभ आणि सुलभही..!	..७०



'त्वदीयम् वस्तु हे भगवन्..!'

आपला रोजचा व्यवहार पाहिला, तर असंख्य गोष्टींचा वापर, देवघेव चाललेली दिसून येईल. जगाच्या व्यवहाराच्या मानानं, आपला प्रपंच तसा खूप लहान, अगदी नगण्य म्हटलं तरी चालेल. तरीही, ज्याच्या त्याच्या समजुतीच्या विकासाप्रमाणं, तो त्याला लहान-मोठा वाटतो. अनेकांना तर त्यांच्या त्या तशा लहान असलेल्या प्रपंचापेक्षा जगात इतर काही महत्त्वाचं, विचार करण्यासारखं आहे, असंसुद्धा वाटत नाही. ही माणसाच्या जीवनाची शोकांतिकाच म्हणावी लागेल.

पण तितकंच, दुसऱ्या बाजूला, हा प्रपंच करून तो तसा नगण्य आहे, हे लक्षात येऊन मोठ्या पातळीवर जगणाऱ्यांनासुद्धा विचार करायला लावणारी गोष्ट आहेच. इथला व्यवहार एकदोन माणसांपुरता असतो, तर तिथला शेकडो, हजारो, लाखो माणसांचा असतो. तीच गोष्ट वस्तूंची, भूमीची, व्यवहारांची, संबंधांची. दहा-बाय-दहाच्या व्यवहाराला व्यापक परिमाण नसलं, तर जी शोकांतिका होते, तीच दहा हजार-बाय-दहा हजारच्या व्यापक प्रपंचाची होऊ शकते.

खरं तर, मनुष्याला मिळालेला हा जन्म, उत्तम जगणं - उत्तम सुखमय शेवट साधण्यासाठी आहे. याचा अंमल करणारे कधी भेटतात, त्यावेळी आपल्याला याची सत्यता पटते. ते तसं साफल्य, खऱ्या अर्थानं साधू शकतात. याचं कारण, त्यांच्या ठिकाणी एक विलक्षण सावधानता आहे. ती अशी की, ज्याच्या साहाय्यानं हे सारं जीवन जगलं जातं, अगदी संकुचित प्रपंचापासून विशाल वैश्विक पातळीवर जगलं जातं,व्यवहार केला जातो, त्याची मूलभूत साधनसामग्री - हे आपल्याला ईश्वराचं, निसर्गाचं अनमोल दान आहे, याची

त्यांना प्रखर आणि प्रगल्भ जाणीव असते.

आपल्या स्वतःच्या डोळे, कान, नाक, तोंड, वाणी, मेंदू, विचार, कल्पना, निरंतर उपयोगी पडणारे हात पाय - यांपासून जगातली इतर माणसं, जमीन, झाडं, नद्या, नाले, पशू, प्राणी, वस्तू - अशी अगणित दानं आहेत, म्हणून आपला आणि जगात घडतो आहे, तो सारा व्यवहार शक्य आहे. याची त्यांना कृतज्ञ जाणीव असते. अशा जागृत व्यक्ती, दैवी दानांचं चीज करण्यासाठी अत्यंत कार्यशील राहतात. तिथं त्यात ज्यावेळी कर्तृत्वाचाही अभिमान नसतो, तेव्हा जगाचं खऱ्या अर्थानं भलं होतं. जगाला भगवंताचा, आनंदाचा शुद्ध मार्ग मिळून जातो. जगभर चालणारी असंख्य निरपेक्ष आणि कृतज्ञ कार्यं, हे या दैवी दानांतून दिलेले खरे व्यापक अर्घ्य असतात. असे अर्घ्य या दानांचं चीज करतात!

असे चीज करणारे अर्घ्य देण्याच्या छोट्यामोठ्या कृती, कुणाच्याही आयुष्यात कुठंही आणि कितीही करता येण्यासारख्या आहेत. फक्त त्या सुचत, सुचवीत, पाहात, करीत राहावं लागतं. इथं तो प्रयत्न प्रत्यक्ष कृती, संवाद, लेखन - अशा अनेक माध्यमांतून तळमळीनं, नम्रतेनं केला जात आहे. या पुस्तकात मांडलेलं त्याचं रूप कथांचं आहे. त्याला वास्तवातल्या अनुभवांचा आधार आहेच. त्यामुळंच अर्थात, असत्य आणि भगवंताकडं न नेणारे मार्गही वाटेत एखाददुसऱ्या कथेतून येऊन गेले आहेत. पण ते त्या मार्गांकडं पाठ फिरवण्यासाठीच! भावाच्या मार्गानं हृदयापर्यंत पोचण्याचा आणखी एक मार्ग म्हणून, पूर्वीही इथं कथारूपानं झालेले काही प्रयत्न सहृदय वाचकांनी स्वीकारले आहेत, आनंदानं पुढं पोचही केले आहेत.

पुस्तकरूपानं हे आकाराला येण्यात मनःपूर्वक सहकार्य करणाऱ्यांचं ऋण न फिटणारं आहे, तसंच ते 'अर्घ्य' स्वीकारणाऱ्या वाचकांचंही!

संतनगरी, सातारा.
अक्षय्यतृतीया,
२८ एप्रिल २०१७ *- सुहास पेठे*

१. अर्घ्य

दोन मित्र सकाळ-संध्याकाळ गावाशेजारच्या नदीजवळ फिरायला जात असत. एके दिवशी सकाळी फिरायला गेल्यावर ते नेहमीच्या जागेवर बसून नदीकडं पाहत होते. थोड्या वेळानं साध्या खेडूताच्या वेषातला एक माणूस नदीकडं चालत येताना दिसला. धोतराचा काचा मारून तो गुडघाभर पाण्यात नदीत जाऊन उभा राहिला, त्यानं पूर्वेच्या दिशेला डोळे मिटून नमस्कार केला. हे दोघं पाहत होते. त्यानं डोळे उघडले तेव्हा, क्षितिजावर लालसर सूर्य उगवत होता. त्यानं नदीतलं पाणी हातात घेतलं. नमस्कार करून तीन वेळा ते नदीत अर्पण केलं. नंतर तो शांतपणे बाहेर पडून नदीच्या काठानं जात जात आपल्या शेतात कामाला निघून गेला.

पहिल्या मित्रानं तो माणूस गेल्यावर थोड्याशा बेपर्वाईनं, तुच्छतेनं खांदे उडवले आणि तो झाडं - पेडं, नदी असं सारं सृष्टिसौंदर्य न्याहाळू लागला. दुसरा शांतपणानं त्या येऊन गेलेल्या माणसाच्या कृती पाहत होता. सृष्टीचं सारं दृश्य तर त्याच्याही डोळ्यांपुढं होतंच. पण तो डोळे मिटून विचारात पडला होता.

संध्याकाळी ते दोघंही असेच फिरतफिरत पुन्हा नदीकाठी आले. दिवसभराचा आकाशातला तप्त प्रवास करून सूर्य पश्चिमेला क्षितिजावर टेकण्याच्या बेतात होता. एवढ्यात, सकाळचाच खेडूत माणूस नदीकडं येताना दिसला. त्याच्या चेहऱ्यावरून तो दिवसभराच्या कामानं थकून गेलेला दिसत होता,घाम गळत होता. सकाळप्रमाणंच त्यानं मावळतीच्या सूर्याला नमस्कार करून असंच नदीतलं पाणी ओंजळीत घेऊन सूर्याकडं बघून नदीत सोडलं आणि डोळे मिटून हात

जोडले. डोळे उघडले तेव्हा सूर्य अस्ताला जाताना दिसत होता.

हे दोघंही मित्र ते दृश्य पाहत होते. पहिल्या मित्रानं तशाच थोड्याशा तुच्छतेनं खांदे उडवले. दुसरा शांतपणे विचार करीत होता. पुढं पाच-सहा दिवस रोज हेच घडत होतं. शेवटी एके दिवशी न राहवून पहिल्यानं दुसऱ्या मित्राला विचारलं, 'हा किती गावंढळपणा आहे नाही!'

'मला वाटतं, तसं म्हणणं धाडसाचं आहे !' दुसरा.

'खरं सांगण्यात कसलं आलंय धाडस?' पहिला म्हणाला.

'काय खरं आहे सांग बघू ?'

'आता त्यात काय सांगायचं आहे, तूही बघतोसच आहेस हा रिकामटेकडा उद्योग ! तो माणूस आला काय, पाण्यात उभा राहिला काय, तेच पाणी बुचकळून ओतलं काय, पुन्हा निघून गेला काय, पाच मिनिटं जाग्यावर बसलासुद्धा नाही ! काय साधलं त्यानं वेळ घालवून?'

'नुसतं पाहताना तू म्हणतो आहेस तसं दिसतं आहे खरं ! पण दिसतंय ते खरं वाटत असलं, तरी ते तसं असेलच असं मात्र म्हणता येत नाही.' दुसरा.

'असं कसं? दिसतंय त्यापेक्षा आणखीन काय खरं असणार? आपल्यादेखत तो दोन-दोन वेळा आला, पाणी उडवून निघून गेला. हे मीच काय, तूही पाहिलं आहेस. आपण उलट एकाच जागी शांत बसून तोच सूर्योदय पाहत आहोत, सूर्यास्त पाहत आहोत. एका जागी बसून शांतपणानं उलट एवढं निसर्गसौंदर्य पाहतो आहोत. या माणसाला एवढा छान निसर्ग दिसत नाही, त्यातलं सौंदर्य दिसत नाही, आनंद दिसत नाही. आपला येतो आणि पाणी उडवून जातो ! आता याला रिकामटेकडेपणा म्हणायचं नाही, अरसिक म्हणायचं

नाही, तर काय म्हणायचं ?'

दुसरा म्हणाला, 'तू म्हणतोस तशा आपल्या कृती आहेत. त्याच्याही कृती तशाच वाटतात, हे खरं आहे. पण मला वाटतं, वर दिसणाऱ्या कृतींचा खरा अर्थ, त्या कृतीवरून वाटतो तेवढाच असतो, असं नाही.'

पहिला जरा नाराजीनं, तुच्छतेनं म्हणाला, 'मग काय आता कॉलेजच्या अभ्यासाच्या पुस्तकातल्या, धड्याचा अभ्यास करावा तसा काही या माणसाच्या कृतींचा अभ्यास करावा, असं तुझं म्हणणं आहे का ?'

'माझं तर म्हणणं तसं आहेच, पण तो अभ्याससुद्धा आपला आपल्याला पूर्ण करता येईल, असंसुद्धा मला वाटत नाही. कृतींच्या मागचा अर्थ तर लावावाच लागेल. पण त्या कृती करणाऱ्याला ते तसंच आणि तेवढंच अपेक्षित आहे की नाही, हे ठरवणं त्याहीपेक्षा अवघड आहे !'

पहिला उसळून म्हणाला, 'मग आता काय त्या गावंढळ माणसाकडं जाऊन, पायाशी बसून असे कृतींचे अर्थ समजून घ्यावेत, असं तुझं म्हणणं आहे का ?'

'होय ! पण जर खरं शिकायचं असलं तर, त्यासाठी आपल्याला कुठं फार दूर जावं लागत नाही. देव ते अर्थ, ते शिक्षण जवळच काय घरीसुद्धा द्यायची व्यवस्था करतो..' असं म्हणत त्यानं बोटानं खूण केली,'..ते बघ..तोच नेहमीचा खेडवळ माणूस नेहमीच्या वेळेला नदीच्या जवळ येतो आहे. त्याचं काम होऊ दे, मग आपण सरळ त्याच्याशीच बोलू ना! '

पहिला जरा घुश्शातच होता. एका गावंढळ माणसाकडं जाऊन, आपल्यासारख्या सुशिक्षितांनी शंका विचारावी, याचा

त्यालाथोडा अपमान वाटत होता. दुसऱ्यानं ते ओळखलं आणि म्हणाला, 'आपण पुढं होऊ नाहीतर त्यांना हाक मारू.' असं म्हणत पहिल्याला घेऊन दोन पावलं पुढं होत पहिल्याच्या समाधानासाठी दुसऱ्यानं त्या माणसाला हाक मारली,'ओ दादा, एक दोन मिनिटं बोलू का ?'

तो गृहस्थ जरा थबकला. या दोघांच्याकडं त्यानं पाहिलं आणि नदीकडून चढत येत तो म्हणाला,'ओह् येस! व्हाय नॉट ? वेलकम् !'

ते ऐकल्यावर दुसऱ्यानं पहिल्याकडं पाहिलं. पहिल्या उत्तरातच तो चपापला होता. त्याअर्थानं दुसरा शांत होता.

ते गृहस्थ जसे जवळ आले, तसं या दोघांच्या लक्षात आलं की, ते वेषावरून खेडवळ वाटत असले तरी तसे नसावेत. आणि मध्यम वयाचे वाटत असले तरी प्रौढ आहेत. दुसऱ्यानं पुन्हा पहिल्याकडं पाहिलं. पहिल्याला, दुसऱ्याच्या डोळ्यांतच दिसत होतं. दिसण्यावरून - कृतीवरून ते जसं दिसतं - वाटतं, तसं ते नसतं, हे जे दुसरा म्हणत होता, त्यात तथ्य आहे. ही तर त्या तथ्याची पहिली झलक होती.

आपणच त्या गृहस्थांना बोलावलं आहे, काही विचारायचं म्हटलं आहे. पण आता नेमकं आणि काय काय विचारावं इथं पहिल्याचीही गाडी अडली होती आणि दुसऱ्याचीही. ते तर, उत्सुकतेनं हे काय विचारतात, याची वाट पाहत होते.

शेवटी दुसऱ्यानं पहिल्या मित्राच्या वतीनं सुरुवात केली, 'म्हणजे काय झालं, आम्ही इथं सकाळ संध्याकाळ पाय मोकळे करायला, फिरायला यायला लागलो. साधारण, त्याच वेळेला तुम्ही इथं येता, नदीत जाऊन हात, पाय, तोंड धुऊन निघून जाता. नदीत

काही काळ उभे असता. तेही रोज सकाळी आणि संध्याकाळीही. ते आमच्या या मित्राला जरा वेगळं वाटलं. आमची चर्चा झाली. शेवटी मी म्हटलं, आपण तर्कवितर्क करण्यापेक्षा सरळ तुम्हाला विचारू !'

ते गृहस्थ म्हणाले, 'तुम्ही नदीकाठी बसला होता, पण जरा वर, दगडावर होता. त्यामुळं माझं काही विशेष लक्ष गेलं नाही. बरं, तसं लक्ष जावं असंही तुम्ही काही करत नव्हता..!'

दोघांनी ओळखलं. हे नुसतं गुडघाभर पाण्यात उतरणारे माणूस नव्हेत. आपण मागच्या पावलावर घेतलेलं बरं. दोघं म्हणाले, 'ते बरोबर आहे. आम्ही आपलं शिणवटा घालवायला निवांत वाऱ्याला येऊन बसत होतो..!'

'ते छानच आहे! दिवसभर कामाचा ताण असला म्हणजे नदीकाठच्या मोकळ्या हवेनं शीण दूर होतो. त्यामुळं, मी नदीत जाऊन येतो हे कदाचित तुम्हाला वेगळं वाटलं असेल. कदाचित गावंढळपणाही वाटला असेल !'

दोघंही विचारात पडले आणि गप्प बसले.ते गृहस्थ म्हणाले,'पण तुम्ही विचारणार होतात त्याचं काय झालं ?'

दोघांचीही शब्दांची जुळवाजुळव सुरू झाली. पहिला थोडा खजिलही झाला होता. दोघं म्हणाले,'नाही आपलं ते असंच.. !'

ते गृहस्थ थोडं हसत म्हणाले,'असं बघा, तुम्ही सकाळ संध्याकाळ कुठंतरी गावात,चौकात,बागेत जाण्यापेक्षा इथं का येता?'

दोघं म्हणाले,'दिवसभर कामांत गर्दीतच जातो. इथं झाडंपेडं असतात, शांतता असते, नदी असते, सूर्योदय, सूर्यास्त असतो, मोकळी हवा असते..!'

गृहस्थ म्हणाले,'बरोबर! त्यामुळं दिवसभराचा शीण जातो,आपल्याला प्रसन्न वाटतं!' आणि त्यांनी एकदमच विचारलं,

'.. तुम्ही हॉटेलमध्ये जाता का ?'

दोघांनी एकमेकांकडं पाहिलं, नाही म्हणणं शक्य नव्हतं. 'हो तर !'

'तिथं काय तुम्हाला नुसताच चहा पिऊन येता येत असेल?'

'म्हणजे आम्ही नाही समजलो ?' दोघं.

'म्हणजे असं, आपलं ऑर्डर दिली, चहा प्यालं, निघून आलं..!'

दोघांच्या रोख थोडा लक्षात आला, 'ते तर बरोबर आहे पण फुकट थोडंच पितो? बिल द्यावं लागतं ना !'

ते म्हणाले,'का बरं ? तुम्ही दमलाय, कंटाळा आलाय, चहा प्यालाय. त्यात मी म्हणतो, बिलाचा प्रश्नच येतो कुठं ?'

दोघं नकळत उद्‌गारले,'असं कसं होईल? आम्ही कामाला जाऊन दमलो म्हणून काय, त्यांनी फुकट चहा द्यावा का ? त्यांना खर्च आहे. उलटं, आम्हाला वेळेला मिळतो आहे, म्हणून पुढचं काम सुचतं आहे. मग चहाची किंमत नको का द्यायला? ते तर आमचं कर्तव्यच आहे !'

'म्हणजे तसंही किंमत दिली म्हणजे आपलं काम संपलंच म्हणायचं !'

दोघं विचारात पडले. काही आठवण झाली. मग म्हणाले,'मध्ये कंपनीत पगार नव्हते. तेव्हा महिनाभर चहा पीत होतो, पण चहावाल्यांनी पैसे नाही घेतले. नंतर पगार झाला तेव्हासुद्धा नाही घेतले. पगार सुरू झाल्यावर घेतले पण मधले उपकार मात्र तसेच राहिले!'

गृहस्थ म्हणाले,'हे घडून किती महिने झाले तरी तुमच्या ते उपकार लक्षात आहेत. आता तुमची परिस्थिती आहे पण तेवढं

बिलच नव्हे तर त्याच्यावरचं व्याज देऊनसुद्धा हे उपकार फिटणार नाहीत, खरं ना? '

दोघांच्याकडं होकाराशिवाय उत्तरच नव्हतं.

'आता मला सांगा, एक कपभर चहानं तुमची दमणूक गेली. त्याचं बिल दिलं तर एकवेळ व्यवहार संपेल. तरीसुद्धा लक्षात घ्या, तो चहा देणारा कुणीतरी होता, त्यानं तो नीट केला, वेळेला दिला - या सगळ्याचं आपण काही दिलेलं नाही. बिल देऊ शकलो नाही, त्यावेळचे उपकार तर आहेतच.'

'शेवटी ती एक घोटभर वस्तू. तासाभरापुरती. तिथली तास दोन तासाची कामाची दमणूक जावी, म्हणून जे घोटभर मिळालं, त्याचेसुद्धा जे उपकार आहेत ते फेडता येत नाहीत. मनुष्य पाच मिनिटांच्यावर हॉटेलमध्ये बसू शकत नाही..'

'..इथं तुम्ही सात-आठ तासांचा शिणवटा जावा म्हणून नदीकाठी तासभर बसता आहात. उदंड वारं, अमाप झाडंपेडं, अखंड वाहती नदी, बसाल तिथं मोकळी जागा, डोक्यावर निरभ्र, मोकळं आकाश - तुमचा अख्ख्या दिवसाचा शिणवटा जातो. त्याचं तुम्ही रोज जाताना बिल देता की उपकार मानता ?'

दोघांची थोडी चुळबुळ सुरू झाली. ती बघून ते आपण होऊनच म्हणाले,'तुम्हाला वाटेल हे सगळं नैसर्गिक आहे. त्यांत कुठं कोण किंमत मागतं ? अशा गोष्टींची किंमत करताही येत नाही आणि देताही येत नाही, बरोबर आहे ? '

ते दोघंही म्हणाले,'खरं आहे. आम्हांला उपयोग होतोच आहे. पण याला काही किंमत असेल असं काही आमच्या मनात आलं नाही. उपकार आहेत हेही खरं आहे. पण करणार काय? ते असे कुठलं बिल देऊन, पैसे देऊन थोडेच फिटणार आहेत ? आपण

त्याबद्दल काहीच करू शकत नाही... '

'जरा थांबा!' त्यांना थांबवीत ते गृहस्थ म्हणाले, 'आयुष्यात त्या अर्थानं चहा, कॉफी, अन्न, पाणी, धान्य, वस्तू- अशा असंख्य गोष्टी आहेत, ज्यांची थोडीतरी किंमत फेडता येते. पण मगाशी तुम्ही म्हणालात, तसं त्यात्या गोष्टी वेळेला मिळण्यात, उपयोगी पडण्यात, देणारा भेटण्यात - होणारे उपकार कधीच फेडता येत नाहीत. ज्या अर्थानं आपण किंमत मोजतो तीसुद्धा खरी, रास्त असतेच, असं म्हणता येणं अवघड आहे. शेतकऱ्याला बाजारातून शेतीच्या मालाची किंमत मिळते, पण अनेकदा ती त्याचं भागेल एवढा नफा देणारी नसते. कित्येकदा तर, त्याचा झालेला खर्चही भरून निघेल एवढी नसते. असं किती गोष्टींच्या किमतीबद्दल घडत असेल? त्यावर बाजारातलं आपण देत असलेलं मोलसुद्धा शेतकऱ्याच्या किंवा उत्पादकाच्या मालाच्या रास्त किमतीएवढं असतं असं नाही. इथं आम्ही घेतलेल्या, वापरलेल्या वस्तूचं मोल देत असू हे खरं नाही. '

ते पुढं म्हणाले,'हे बरोबर आहे. आता मला सांगा, तुमचा दिवसभराचा शिणवटा तर नदीकाठी बसून गेला, रोजही जाईल. पण तो काही कुठल्या एका गोष्टीवर अवलंबून नाही. विचार करा, इथली झाडं, पाणी, प्रकाश, मोकळी जागा-आपण नक्की किती वापरली, त्याचं मोल आपण कसं करणार, त्याची आपण कोणती परतफेड करणार. त्यांनी तुम्हाला आनंद तर दिला आहेच, रोज देत आहेत, त्यांचे उपकार आहेत. यात तर मित्रांनो, तुम्हाला कोणती शंका तर नाही ना ?..'

दोघेही निरुत्तर होते. वरवर पाहून काढलेले निष्कर्ष कधीच चुकीचे ठरले होते, विरून गेले होते. सारं पटत होतं, मान्य होतं, पण पुढचं काही सुचत नव्हतं, म्हणून ते म्हणाले, 'असा विचार आम्ही

केला नाही. तुमच्या नुसत्या सकाळ संध्याकाळ येण्याजाण्यावर चुकीचे निष्कर्ष काढले. त्याला काहीतरी गावंढळपणा ठरवला. आजवर या नदीचे, पाण्याचे, झाडापेडांचे, वाऱ्याचे अगणित उपकार घेतले. पुढंही आयुष्यभर घेत राहणार. हे सगळं असलं तरी त्याची किंमत सोडाच, पण परतफेडही शक्य नाही. तुम्ही इतका विचार केला आहे, आता तुम्हीच आम्हाला काही सांगा !'

'तुमच्यावर झाले तसे माझ्यावरही असंख्य उपकार झाले आहेत. पैशांत तर तुमच्यासारखं मलाही फेडता येणार नाही. व्यवहारात काही देवघेव करून परतफेड करता येते. चहाचा कप घेतला तर दहावीस रुपये देऊन थोडीफार तरी परतफेड होते. पण बाकीच्या जगातल्या इतक्या माणसांचे उपकार..? त्यांचं काय करायचं ? कंपनीच्या पगाराबद्दल काम केलं तरी कंपनीचे ग्राहक होऊन कंपनी टिकवणाऱ्या आणि कौशल्यानं ती चालवणाऱ्या मालकांचे उपकार फिटत नाहीत. शाळा कॉलेजमधल्या शिक्षणाची फी भरून शाळा चालेल - शिक्षकांचे पगार वाचतील पण विद्येचे उपकार फिटणार नाहीत. देवापुढं पैसे ठेऊन कदाचित मंदिर चालेल, पुजाऱ्यांची व्यवस्था होईल पण देवाच्या आशीर्वादाचे उपकार फिटणार नाहीत. असा विचार कराल तेवढं थोडं आहे..! '

दोघं म्हणाले,'मग यासाठी करायचं काय ?'

ते म्हणाले,'ज्याचे ज्याचे उपकार मी घेतो, ज्याच्या ज्याच्यावर मी जगतो, त्याच्या त्याच्यासाठी काही करायची व्यवस्था आहेच. तिची पहिली पायरी - या सगळ्याची सतत जाणीव. मग एकेक क्षेत्र. मी तर अन्नावर जगतो, पाण्यावर जगतो, हवेवर जगतो. मी शेतकरी असेन, तर एक चौथाई देव- धर्म - गुरंवासरं - श्रमिक - गाव यांच्यासाठी देऊन, त्यामार्गानं सगळ्यांचे उपकार फिटण्यासाठी. तेच,

कष्टानं मिळवलेल्या पैशाच्या बाबतीत. त्याच्याही विनियोगात हा विचार ठेवता येतो. तीच गोष्ट शरीरकष्टाची. एरवीच्या कष्टांना काही ना काही मोल मिळतं. ते गरजेसाठी मनुष्य करतोच. पण कष्टाची कुवत असलेल्यांना, कुणाच्याही शेतात त्याला गरज असलेल्या वेळी काहीही न घेता, कष्ट करता येतात. त्यात माती, अन्न सगळ्यांचे उपकार नकळत फिटतात. अशा किती जागा शोधता येतील !'

ते पुढं म्हणाले, 'काही उपकार असे आहेत की, जे या कसल्याच मार्गानं फिटत नाहीत. आपलं जीवनचक्र चालवणाऱ्या सूर्याची तर सोडाच पण प्रकाशाचीही किंमत मोजणं अशक्य आहे, उपकार फिटणं अशक्य आहे. इतकंच नव्हे तर, एकवेळ झाडाच्या पानांना,खोडाला हात लावून नमस्कार करता येणं शक्य आहे. सूर्याच्या बाबतीत यांतलं काहीच शक्य नाही. त्यासाठी विचार केला की मार्ग सापडतो, पूर्वी शोधूनही ठेवला आहे. आकाशाच्या आनंद देणाऱ्या पोकळीचे उपकार, आपल्या जगण्यात विशालता आणून, असंख्य लोकांचं प्रेमळ छत्र होऊन फिटतात. वाऱ्याचे उपकार शांत राहिल्यानं, हवा जपून वापरून, कुठंही स्थावरांत न अडकता आत्महितासाठी आणि जगाच्या हितासाठी सर्वत्र संचार करून फिटतात. या आजूबाजूच्या झाडापेडांत तोड न करता, त्यात शक्य ती भर घालून ते उपकार फिटतातच पण त्याहीपेक्षा लोकांना सौजन्याच्या, शीतलतेच्या वृत्तीचा सुगंधी प्राणवायू देऊन फिटतात. आणि या सतत वाहत्या नदीबद्दल काय म्हणावं ! '

त्यांचा आवाज जड झाला. तरी ते म्हणाले,'इथं पलीकडं नदीकाठी माझी मोठी शेती आहे. गावाला पाणी, विहिरींना पाणी आणि जीवांना जगवणाऱ्या या शेतीला पाणी. शेतीचे अगणित उपकार आहेत. तुम्ही विचार करा, दिवसभराच्या कामाचा शिणवटा

देऊन तुम्ही इथून शांती, उत्साह नेण्यासाठी संध्याकाळी नदीकाठी येऊन बसता. सकाळी तर तुम्ही येण्यापूर्वी रात्रभर विश्रांती घेतलेली आहे. तरी तुम्ही सकाळी आलात, जरूर या. मोकळ्या हवेतला व्यायाम, उगवत्या सूर्याची ऊर्जा आणि वातावरणानं प्रफुल्लित होणारं चित्त - सगळं तुम्ही भरून नेणार ते दिवसभराची कामाची ओझी उचलायला उपयोगी पडावं म्हणून ! म्हणजे तुम्ही या सर्वांकडून सकाळीही नेणार आणि संध्याकाळीही नेणार !'

'..मीही आमच्या रानाकडून सकाळी इथं आलो, संध्याकाळीही आलो. पण मला माहीत आहे की, सकाळ - संध्याकाळी मी इथं येऊन नुसतं नेणार नाही. जगातली काही नाती,काही घटक,काही उत्तुंग गोष्टी अशा आहेत की,त्यांच्याबद्दल फक्त निरंतर कृतज्ञता बाळगता येते आणि काही फक्त प्रतीकात्मक कृती करता येतात. ते सगळे भाव मनात बाळगून भगवंताचं सतत स्मरण ठेवता येतं..'

'दिवसरात्र आमच्या सुखासाठी तपश्चर्या करणाऱ्या सूर्याला नमस्कार करता येतो. आणि आम्हांला-आमच्या प्राणांना जगवणाऱ्या पाण्याला प्रेमळपणे थेट ओंजळीत घेता येतं आणि त्याच पाण्यात आपली सारी कृतज्ञता ओतून ते अमूल्य पाणी, कुठंही वाया जाऊ न देता, ते तसंच नदीला अर्पण करता येतं!'

'आपला सारा व्यवहार ज्या भाषेत चालतो, असंख्य विचार, कल्पना, भावना जिच्यामुळं आपल्याला व्यक्त करता येतात, तसंच इतरांच्या त्या गोष्टी आपल्या हृदयापर्यंत पोचतात, तिचे उपकार जसे तिच्यातलेच शब्द वापरून आपण व्यक्त करतो, त्याची जाणीव वाढवतो, त्यानं आपलंच जीवन समृद्ध होतं. तसंच हे नदीला नदीतलंच पाणी घेऊन, त्यात भाव ओतून अर्पण करणं आहे. ते

पाण्यात बुचकळणं नव्हे, पाणी उडवणं नव्हे. ती भावनेच्या फार उंचीवरची कृती आहे ! तिला 'अर्घ्य' म्हणतात !'

क्षणभर तिघंही स्तब्ध होते. शेवटी या दोघांनी विचारलं,'आपल्या कृतींवरून आम्ही काढलेले अर्थ आणि निष्कर्ष किती बालिश होते,याची आम्हाला कल्पना आली आहे. इतकी की, ती आली आहे असं म्हणणंही धाडसाचं आहे. पण फार फार विचार करायला हवा, तर नक्कीच खऱ्या अर्थानं काही चांगलं करता येईल..'

'इथं आपण नदीकाठी आणि तिच्याबद्दलच बोलत होतो म्हणून एक शंका वाटते, आम्ही इथं येतो म्हणून किंवा या गावी ते शक्य आहे म्हणून, असा कृतज्ञतेचा अर्घ्य देऊन थोडं का होईना उतराई होता येईल. पण जिथं जवळ नदी नाही, ज्यांना येणं शक्य नाही, त्यांनी ही भावना कशी जपावी ?'

ते म्हणाले,'प्रश्न नदीचा आणि तिच्यातल्या पाण्याचा, अर्घ्य देण्याचा नाहीच. ती विशिष्ट परिस्थितीत शक्य होणारी आदर्श कृती आहे. कृतीमागचा कृतज्ञतेचा भाव तर सर्वांनाच लागू आहे. इथल्याच अर्घ्यावरून पाहावं. आपण तिच्यातलंच पाणी चांगली कृती करण्यासाठी मागून घेतलं, अलगद सांभाळलं, सांडलवंड केली नाही, मनोमन भाव ओतला आणि वाहतीच नदी आहे म्हणून तिच्यात ते अर्पण केलं. समजा,आपण घरी असू, प्रवासात, कारखान्यात, ऑफिसमध्ये असू - पाण्याशिवाय आपला दिवस जाणं तर शक्य नाही. आपल्यापर्यंत पाणी कसंही पोचलं तरी ते जलाशय, नदी यांतूनच येणार आहे. त्यामुळे तो तर प्रश्न नाही. प्रश्न, ते आपल्याला तसंच्या तसं जलाशयात, नदीत सोडता येणार नाही. पण कुठल्याच पाण्याची हेळसांड, सांडलवंड, गैरवापर न करता आपण अर्घ्यासाठी

हातात घेतलेलं पाणी इतकं जपून आणि भावानं वापरलं, तितकं आणि तसं ते आपल्याला घरीदारी सगळीकडं वापरता तर जरूर येईल. म्हणून, प्रातिनिधिकपणे आपल्याकडे अर्धं भांडं का होईना,पाणी तुळशीला किंवा झाडाला, रोज अर्पण करण्याची पद्धत आहे. अगदी नदीच्या पाण्यात आपण अर्घ्य सोडला,तरी एरवी आपणही तिच्यातलं पाणी पितोच ना? तेच घरीदारी घडू शकेल. फरक फक्त, तेच पाणी निरपेक्षपणे नदीत सोडायचं, तुळशीला द्यायचं, तहानलेल्याला द्यायचं की कोमेजलेल्या फुलझाडाला घालायचं - हा कृतींतला फरक राहील. कृतीत फरक राहिला तरी जाणीव, कृतज्ञता, भाव आणि त्यामुळं असलेली निसर्गाची - भगवंताची कृपा तर सारखीच राहील !'

'..ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून केलेल्या अशा प्रातिनिधिक कृती म्हणजे अर्घ्यच आहेत. विद्येला निरपेक्ष विद्यादान, अन्नाला पक्ष्यांना भोजनं, वृक्षवल्लींना निरपेक्षपणे वाढवलेली रोपं, पाण्याला निर्मल-प्रवाहित ठेवणं, वायूचा संयमित वापर, त्याला प्रदूषणमुक्त ठेवणं, सूर्याचे नमस्कार, जमिनीच्या कशाही वापराबद्दल तिची रोज क्षमाप्रार्थना आणि भगवंताचं स्मरण - हे त्यांचे त्यांचे अर्घ्यच आहेत !'

आधी या गृहस्थांना खेडवळ ठरवणाऱ्या आणि रिकामटेकडे उद्योग करणारे समजणाऱ्या, त्या दोन मित्रांपैकी पहिला तर पूर्ण जमिनीवर उतरला होता. दुसऱ्यालाही खूप काही कळलं होतं. आताच्या उरल्यासुरल्या सांगण्यानं दोघांना एकच कृती लगेच शक्य होती. दोघांनीही तिथंच नदीकाठी त्यांना साष्टांग नमस्कार घातला. आपल्या आजवरच्या आयुष्यात आपण किती उथळ जगलो, किती चुकीच्या विचारांनी इतरांनाही दोष दिले - असं सगळं मनात दाटून

येत होतं. आता प्रश्न विचारायचं धाडस नसलं, तरी एक गोष्ट मात्र उलगडली नव्हती. ती म्हणजे, हे गावंढळ वाटणारे गृहस्थ कोण ?

ते दोघं म्हणाले,'आत्तापर्यंत चुकीच्या जगण्यात आणि चुकीचे विचार करण्यात आम्ही फार गटांगळ्या खाल्ल्या आहेत, हे आता चांगलं लक्षात आलं. तुम्ही आम्हाला समजून घेतलं. आता जरूर योग्य कृती करू. तरीसुद्धा आता एक शेवटचं धाडस करू का ?'

ते गृहस्थ म्हणाले,'जरूर करा! तरुणांना धाडसाचा अधिकार आहे, चुकीच्याही !'

दोघांनी चाचरत विचारलं,'आपला वेष बघून आमच्या लक्षात आलं नाही आणि परिचयही कळला नाही.'

ते म्हणाले,'माझं नाव दादा. पाठच्या साऱ्या बहिणी आहेत. मी ज्या वेषात आहे तोच माझा जन्मापासूनचा वेष आहे. मी याच गावात, याच रानात वाढलेलं मूल आहे. काही काळ याच रानाच्या उन्नतीसाठी शिक्षणाची, तंत्रज्ञानाची मुशाफिरी केली. लहानपणी पोटासाठी रानाबरोबर मजुरीही करावी लागत होती. आता परिस्थितीनं तशी गरज नाही. पण, या काळ्या आईची सेवा सोडायची नाही म्हणून राहिलो आहे. आता जमीन कसतो पण पीक घरी येत नाही, गरजूंच्या घरी पोच होतं. शेती चालते, ती या नदीच्या पाण्यावरच. शेतीजवळ नदीला उतार नाही. म्हणून, दिवसभर मला आणि माझ्याबरोबर या भावनेनं राबणाऱ्यांना बळ मिळावं, म्हणून इथं नदीच्या उताराला सकाळी अर्घ्य देऊन बळ मागतो. उदंड बळ मिळतं. म्हणून संध्याकाळी उताराला येऊन कृतज्ञतेचे अर्घ्य देतो ! हे माझं कार्ड ठेवा. कधी लागलं तर असू देत. इथल्या जमिनीची सोय पाहून कधीकधी देशपरदेशांतल्या सल्लागार मंडळांवर असल्यामुळं, क्वचित जावं लागतं. एरवी आपली भेट नदीकाठी आहेच !'

दोघंही हलायला तयार नाहीत, असं लक्षात येऊन ते पुढं म्हणाले,'अजून काही विचारायचं आहे का ?'

ते म्हणाले,'विचारायचं संपलं. एक परवानगी हवी आहे.'

'कसली परवानगी? बोला..!' ते गृहस्थ म्हणाले.

दोघंही हात जोडून म्हणाले,'उद्या सकाळपासून तुमच्या रानात मजुरी करायची परवानगी हवी आहे. तीसुद्धा बिनपगारी! '

वळता वळता ते गृहस्थ म्हणाले,'आणि नोकरीचं काय करणार?'

'सेकंड किंवा थर्ड शिफ्ट घेणार !'

'मग दिली! सकाळी सातला हजर पाहिजे मात्र, इथं दगडावर नाही तिकडं रानात.. कबूल ? '

'कबूल, बिनशर्त कबूल !'

'शाबास पोरांनो!' ते गृहस्थ नेहमीप्रमाणं झपझप निघून गेले. इतका वेळ दोघांनाही हातातलं कार्ड त्यांच्यासमोर बघायचं धाडस झालं नव्हतं. आता बघितलं. 'डॉ. दादासाहेब, कुलगुरु, केंद्रीय कृषि विद्यापीठ एवम् निदेशक राष्ट्रीय कृषि अनुसंधान तथा संशोधन !'

दोघांच्याही मनात आलं, आपण फार उत्तुंग व्यक्तिमत्वासमोर उभे होतो, पाहत होतो तो होता, काळ्या आईला आणि माणसांना दिला जाऊ शकणारा आणखी एक उदात्त 'अर्घ्य' !!

***

२. प्रगतीचा पहिला क्षण

इंटरकॉम वाजला. एका खात्याच्या प्रमुखाचा-मिलिंदचा असल्यामुळं साहेबांनी तो घेतला. मिलिंद म्हणाला,'सर, पाच-दहा मिनिटं हवी होती, थोडं बोलायचं होतं. केव्हा मिळू शकतील?'

'आत्ता पाठोपाठ मीटिंग्ज आहेत. साडेसहा होतील. संध्याकाळी सातला भेटूया, चालेल ?'

'चालेल सर, पण आधी कुठं ॲड्जस्ट होण्यासारखं नाही का?'

'अरे अवघड आहे, म्हणूनच म्हटलं !' सर.

'ओके सर !' मिलिंद.

संध्याकाळी सात वाजता ठरल्याप्रमाणं मिलिंद सरांच्या समोर फाईल घेऊन बसला होता. सर म्हणाले,'बोल काय म्हणतोयस?' त्यांना साधारण अंदाज होता, पण त्यांनी शांतपणे त्याला सुरुवात करू दिली.

'विशेष नाही, या आठवड्यात परफॉर्मन्स ॲपरायझल्स झाली. काल मलाही माझ्या कामाचं ॲपरायझल मिळालं...!' त्याच्या स्वरांतली नाराजी लपत नव्हती.

सर एकदम समजुतीच्या स्वरांत म्हणाले,'मला वाटतं, तुझं रेटिंग तेच ठेवलं आहे, याबद्दलच ना ?'

तो जरा अधिक नाराजीनं म्हणाला,'हो, ते तर आहेच ! पण माझ्यानंतर दोन वर्षांनी कंपनीत आलेल्यांना मात्र बरोबरीचंच नव्हे, एक स्टेप वरचं रेटिंग आहे ! याला मी बरोबर मूल्यमापन समजू की

अन्याय, की त्याच्यावरची मर्जी..?' त्याचा नाराजीचा सूर नकळत वाढलेला होता. तो पुढं म्हणाला, 'एकवेळ त्याच्यावरच्या मर्जीबद्दल मला काही म्हणायचं नाही, पण मला त्याच जागी ठेवण्याचं कारण कळलं नाही. म्हणून आपली भेट घ्यायला आलो..'

सर म्हणाले,'मला वाटतं मिलिंद, गेल्या वर्षीही तुझं रेटिंग तेच ठेवण्यात आलं होतं. त्या वेळी तर मी इथं नव्हतो..'

त्यांना जणू थांबवीत मिलिंद म्हणाला,'..सर, मला तसं तुमच्याबद्दल काही म्हणायचं नाही. पण.. '

सर म्हणाले,'तुझ्या प्रतिक्रिया मी शांतपणे समजून घेऊ शकतो. फक्त काही बोलण्यापूर्वी मला हे सांग की, तुला खरंच नीट समजून घ्यायचं आहे, प्रगती करून घ्यायची आहे की, तू काढलेले निष्कर्ष बरोबर आहेत, हे ठरवायचं आहे?'

प्रश्न सरांच्या पातळीवरचा होता, त्यामुळं तो थेटही होता आणि चटकन उत्तर देण्यासारखाही नव्हता. त्यामुळं नाराजी, राग हे जरी थोडं उसळत असलं तरी, त्यापोटी या प्रश्नाला उत्तर देता येणार नाही,एवढं मात्र मिलिंदच्या लक्षात आलं.त्यामुळं स्वतःला आवरून क्षणभर तो गप्प बसला. त्याला काहीतरी म्हणायचं होतं. पण ते म्हणणं बरोबर होईल की नाही, असा संभ्रम झाल्यामुळं तो मिनिटभर तसाच बसून राहिला.

सर अनुभवी, व्यवस्थापनात मुरलेले होते. त्यांनी विचारलं,'मला वाटतं, गेल्यावर्षी इथं दुसरे ॲप्रेझर असताना त्यांनीही तेच रेटिंग कायम ठेवलं, यावर्षीही तेच आहे. काम तर तू दोन्ही वर्षं करतोसच आहेस.' ते मुद्दामच थोडे थांबले.

'होय सर, तेच तर मी म्हणतोय..! मी जर दोन्ही वर्षं इथंच काम करतो आहे, माझ्यापरीनं चांगलं काम करतो आहे, तर मग दोन

वर्षं होऊनसुद्धा रेटिंग तेच राहावं, याची कारणं मला समजत नाहीत.'

'तुला ती कारणं समजून घ्यायची असतील, आवश्यक बदल तुझ्यात घडवायचे असतील, त्यासाठी प्रगतीचे खरे प्रयत्न करायचे असतील, तर ती कारणं समजून घ्यायला, तुझ्याबरोबर चर्चा करायला, मी अजून अर्धातास काय आणखीसुद्धा वेळ द्यायला तयार आहे. नसेल, तर मात्र आपली भेटीची वेळ संपलेली आहे!'

आता मिलिंदसमोर पर्याय होता, तो उठून जाण्याचा. पण सरांच्या सभ्य, समजूतदार आणि सहकार्याच्या भूमिकेमुळं त्याला, का कुणास ठाऊक, तसं करणं शिष्टाचारालाही बरोबर वाटलं नाही आणि त्यांच्या मदतीच्या एवढ्या भूमिकेला प्रतिसाद म्हणूनही, बरोबर वाटलं नाही. त्यामुळं तो जरा दबलेल्या पण शांत आवाजात म्हणाला,'नाही. आपण वेळ देत असाल, तर मला हे समजून घ्यायचं आहे.'

सर म्हणाले,'धिस इज अ पॉझिटिव्ह इंडिकेशन ॲण्ड अ फर्स्ट स्टेप टू..!'

'म्हणजे माझ्या लक्षात आलं नाही..?' मिलिंद.

सर म्हणाले,'तुझ्या प्रगतीची सुरुवात,हे समजून घेण्यापासूनच आहे. तू करीत असलेलं काम हा फार मोठा अडचणीचा विषय नाही. पण इतर काही गोष्टी आहेत, ज्यांच्यावर विचार करण्याची गरज आहे. एखाद्यानं कामाबद्दल किंवा इथं रेटिंगच्या संदर्भात दोष दिला तर, तिथं त्याला दोष देऊन, माझ्यावर अन्याय होतो आहे असं म्हणणं आणि त्यावर त्याबद्दल वाटलेला रोष-अन्याय मनात ठेऊन काम करीत राहणं, हे असमंजसपणाचं आहे, हे लक्षात घे. तो दोष-उणीव का दाखवली गेली, हे आधी नीट समजून घ्यायला हवं!'

'पण मी असं समजून घेत राहिलो तर लोक सारखेच मला दोष देत राहतील..'

'अडचण आहे ती इथंच. ते सारखेच दोष देतील असं गृहीत धरणं हे रास्त आहे का, याचा विचार कर. तू समजून घेत नसशील,तर अशा रेटिंगचा आणि ते देणाऱ्याचा विचार करीत बसशील. वास्तविक, याची खरी कारणं किती वेगळी आहेत..! तुझा अनुभव काय ?'

'आता तू समजून घेणार असशील, तर तुला बऱ्याच गोष्टी लक्षात येतील. तुला हेही कळेल की, याचा वास्तविक फायदा हा तुलाच होणार आहे.'

'तुझ्या रेटिंगच्या संदर्भात दोन गोष्टी आहेत. एक, तुझं काम. जे साधारणतः तुमच्याकडून अपेक्षित असलेल्या कामांशी ताडून पाहिलं जातं. दुसरं म्हणजे, ते ताडून पाहणारा. त्याला पाहण्यासाठी त्याअर्थानं असं फारसं व्यक्तिगत स्वातंत्र्य नसतं. मुद्दाम एखाद्यावर राग धरून त्याचं वेगळं चित्र निर्माण करणारे अपवाद तू क्षणभर सोडून दे. ते अशासाठी की, अशा लोकांचं एखाद्या वेळेला चाललं, तरी ते तसं कायम चालत नाही.'

'हे जे ताडून पाहणारे लोक आहेत - ॲप्रेझर आहेत, त्यांना, दिलेल्या निकषांवर कुठल्यातरी बाबतीत काही अपेक्षित काम होत नसलेलं दिसतं. म्हणून त्याखाली तुमची रेटिंग कमी होतात आणि त्याचा परिणाम म्हणून, तुमचं साधारण रेटिंग हे आत्ता आहे तसं तेच राहतं. यात लक्षात घे की, तुला तुझं काम तुझ्या नजरेनं पाहून चांगलं ठरवण्याची सवय आहे,तो दोष आहे. ते बरोबरीच्या किंवा वरिष्ठांच्या नजरेनं जेव्हा चांगलं ठरतं, तेव्हा ते अधिक निर्णायक आणि खरं चांगलं असतं. यासाठी अर्थातच, त्यांचे दोष पाहण्यापेक्षा तटस्थपणे आपले दोष, उणिवा नीट पाहाव्या लागतात.'

'हे बरोबर आहे. तसा विचार करण्याची गरज आहे. त्यामुळं,

माझ्या आत्ताच्या मतांतल्या चुका दुरुस्त होऊ शकतील.पण त्यांचं पाहणं सदोष असेल तर..?' मिलिंद.

'शक्य आहे. पण एक गोष्ट कायम लक्षात ठेव की, साऱ्या मानवी चुकांवर लक्ष ठेवणारी आणि त्या दुरुस्त करणारी एक निसर्गाची म्हण किंवा देवाची म्हण, व्यवस्था नक्की आहे. ती निर्दोष आणि न्याय्य असते. ती कशाही पद्धतीनं काम करेल. पण ॲप्रेझरच्या पाहण्यात दोष असला आणि तुझं काम बरोबर असलं तर, तुझं नुकसान होणार नाही, याची खात्री बाळग.'

'मला ही विचारांची दिशा नवीन आहे. मी आजपर्यंत बहुधा स्वतःच्याच बाजूनं विचार करीत राहिलो. त्यामुळं माझं वागणं, काम, इतरांबद्दलची मतं - हे सारं मला बरोबरच वाटत आलं. पण आपण म्हणता तसं घडतंय खरं..! माझ्या टीममधली माणसं माझं ऐकत नाहीत, मला अपेक्षित काम देत नाहीत. हे मी अनुभवतो आहे. त्याचा परिणाम, शेवटी माझ्या टीमच्या कामावर होतो आहे. त्यांत अपेक्षित प्रगती दिसत नाही, हे खरं आहे.'

सर म्हणाले,'आता तू खऱ्या प्रगतीच्या दिशेनं विचार करतो आहेस, तर मी तुला एक सहज विचारतो. तू इतरांच्या कामांतले किती दोष आजपर्यंत दाखवत आलास, किती सुधारून घेतलेस, किती सांभाळून घेतलेस..?'

मिलिंद म्हणाला,'याबद्दलची माझी उत्तरं आजपर्यंत वेगळी होती. मी आजवर अनेकांच्या कामांतले दोष दाखवले, त्यांवर ताशेरे ओढले, त्यांना सुधारायला बजावलं. वेळी, रिपोर्टिंगचं भयही दाखवलं. पण..!'

'कुणाचे दोष सोडून दिले नाहीत, सांभाळून घेतले नाहीत, त्यांना ते दूर करण्यात मनापासून मदत केली नाही.. असंच

म्हणायचंय ना तुला..?' सर.

'होय.. यापेक्षा मी अजून नक्की काहीतरी करू शकलो असतो, अजूनही करू शकतो. आता माझ्या लक्षात येतंय की, चांगलं चांगलं काम करू शकणाऱ्या अनेक लोकांनी वरिष्ठांना सांगून माझ्या टीममधून बदली घेतली ती का, हेही मला आता उलगडतंय..!'

'आणि ते कुणाच्या टीममध्ये गेले असतील तेही तुला आता उलगडलं असेल..!' सर.

'अर्थात, बहुतेकजण त्या व्यक्तीच्या टीममध्ये गेले..!'

सर म्हणाले,'अर्थात, ज्याच्यावर मॅनेजमेंटची मर्जी आहे असं तुला सुरुवातीला वाटलं, त्याच व्यक्तीच्या टीममध्ये गेले ना ? आता त्यांचे तिथले कामांचे रिपोर्ट आणि प्रगतीही चांगली आहे. शिवाय, ती व्यक्तीही त्याच्या टीमसह रेटिंगमध्ये पुढे गेलेली आहे, होय ना..?'

'होय...पण मला त्या व्यक्तीबद्दल काही म्हणायचं नाही !'

सर म्हणाले,'पण मला मात्र त्या व्यक्तीबद्दल काही म्हणायचं आहे. तूही काही म्हणावंस, असं मला वाटतं. आपण समजून घेऊ. ज्या माणसांच्या कामांत चुका होत्या, ज्यांची तू हजेरीही घेतली आहेस, ती माणसं त्या व्यक्तीच्या टीममध्ये गेली, तरी त्यांचे दोष तसेचअसणार. बरं, त्या व्यक्तीनं त्यांच्या दोषांविषयी आमच्याकडं कुठलं रिपोर्टिंग केलेलं नाही. त्यांच्या व्यक्तिगत कामांतही उलट सुधारणा आहे. याबद्दल तू काही विचार केलास..?'

मिलिंद म्हणाला,'नाही केला. मी तेव्हा एवढाच विचार केला, नाहीतरी हे चुकार लोक आहेत.आपणहून दुसरीकडं जात आहेत तर जाऊदेत. झाला, तर त्याचा ताप त्या टीमला आहे. मी तर सुटलो..!'

'पण आता तू विचार कर, या मार्गानं तू सुटलास की प्रगतीच्या मार्गात अडकलास? हीच माणसं बरोबर घेऊन ती व्यक्ती तुझ्याबरोबरच नव्हे तर तुझ्यापुढं गेली..!'

मिलिंद म्हणाला,'होय.. ही वस्तुस्थिती आहे, हे माझ्या आता विचार केल्यावर लक्षात येत चाललं आहे.'

'माझा सहकाऱ्यांकडं बघण्याचा, त्यांच्या चुकांकडं बघण्याचा दृष्टिकोनच चुकीचा होता. मला जर ही दृष्टी असती, समजूत असती, तर तो त्यांना जे देऊ शकला, ते मीही त्यांना इथं देऊ शकलो असतो. पण हे माझ्या कधी लक्षात आलं नाही, कधी शिकावसंही वाटलं नाही. आता मात्र, मला उलगडा होत चालला आहे.'

सर थोड्या उत्साहानं पुढं म्हणाले,'तुझं काम चांगलं आहे. या बाकीच्या गोष्टी समजूत, सबुरी - पुरेशा वाढल्या तर तुझंही काम आनंदात चालेल, सगळी टीमही तुला साथ देईल, रेटिंगचा वेगळा विचार करायचं तुला कारणच उरणार नाही..!'

'..तुला अजूनही एक समजून घेण्यासारखी गोष्ट समोर ठेवतो. खरी समजूत यायची असेल, तर लहानांपासून मोठ्यांबद्दल आपल्यात एक सहज नम्रता लागते. मग तुम्ही कुणाहीकडून समजू शकता, समृद्ध होता आणि त्याबरोबर दुसरंही असं की, कुणाहीकडून शिकलं तरी त्याच्या उपकारांचं कायम स्मरण ठेवावं लागतं.. तर प्रगती होत राहते, टिकते..!'

'..तू क्षणभर व्यवस्थापनाच्या, कंपनीच्या बाजूनं विचार कर. एक टीमचा प्रमुख असमंजस असला, तर त्याचे दहांतले सहा सोडून दुसरीकडं जातात. अशाला कंपनीनं हळूहळू रेटिंग देत कंपनी - प्रमुख केलं, तर कंपनीचं काय होईल? शेवटी बहुधा तोच उरेल की नाही? मग रेटिंग देताना आधीपासूनच कंपनीनं विचार केला, तर आता तो

अन्याय की न्याय?' सर.

'अन्याय नव्हे, न्यायच..! तोही असा विधायक आणि आयुष्याला चांगलं वळण देणारा. अशी आपल्यासारखी सांभाळून घेणारी माणसं भेटवणारा..! स्वतःत बदल घडवणारा..! आज आपल्या या मीटिंगमध्ये आत्ता आलेला हा क्षण माझ्या आयुष्यातल्या 'प्रगतीचा पहिला क्षण' ठरणार..!'

सर म्हणाले,'एकतर्फी मतं बनवून आपलंच नुकसान होतं. त्यापेक्षा समजून, इतरांची मतं, वस्तुस्थिती विचारांत घेऊन आवश्यक ते बदल घडवण्यानं - अर्थात समजुतीनं अधिक प्रगती करता येते, हे स्पष्ट झालं ना..? आता या क्षणापासून निश्चित आणि निश्चिंतपणे पुढं जा..!'

मिलिंद म्हणाला,'तुमचे आभार मानायला माझ्याकडं शब्द नाहीत..'

'मलाही शब्द नकोच आहेत, हवी असलीच तर ती कृती आणि तुझी प्रगती..!

***

३. एक आगळी संध्याकाळ !

हातातला चहाचा कप खाली ठेवताना कुणाल बाबांना म्हणाला,'तुम्ही काहीही म्हणा बाबा, जग ॲबसर्ड आहे. देव नाही,कसलीही व्यवस्था नाही,कोण कुणाचं नाही. जो तो स्वार्थी, दुसऱ्याला वापरतो आहे. फार गोंधळ, विरोधाभास आहेत..'

'असू देत.. ते बघू आपण नंतर.. आत्ता सांग चहा चांगला होता की नाही..?' बाबा.

'चांगला काय, उत्तमच होता..' कुणाल.

'सकाळी ऑफिसला जातानाही तू चहा घेतलासच की.. मी पण होतोच तेव्हा. किती छान होता..!'

'छान.? अर्ध्या कपातला निम्मा प्याला.. बाबा, उगाच माझ्या रागाचा पारा चढवू नका..!'

'अरे हळूहळू घे.. उरलेला पाव चहा, कप विसळायच्या निमित्तानं तू काय केलंस, ते मला माहिती नाही का..? पुन्हा आणि वर आमच्या या मुलानं, आईची शाबासकी मिळवली की नाही? आज आपला आपण कप विसळला, सूर्य कुणीकडं उगवला कुणास ठाऊक, म्हणून..!' बाबा.

'बाबा तुम्ही हसताय. पण मी म्हणतोय ते हेच.. जगात असाच सगळीकडं गोंधळ, विरोधाभास, खोटं..! काही म्हणून मनापासून नाही, सरळ नाही..!' कुणाल.

'हां.बरोबर आहे, मी त्या सगळ्यालाच हसतोय!' बाबा.

'अहोऽ बाबा, हे सगळं असं आहे आणि त्याला तुम्ही

हसताय. आता हसताय तेसुद्धा खोटं की काय ..?'

'बघ बाबा, माझं तरी हसणं खरं आहे. तू ठरव..'बाबा.

'मी पाहिलंय.तुमचं खरंच असतं.फक्त मला हे कळत नाही, तुम्ही बेचव चहापासून या सगळ्या विरोधाभास, गोंधळ, तोंडदेखल्या गोष्टी - साऱ्यालाच छान कसं काय म्हणू शकता.?'

बाबा हसत म्हणाले,'माझं ते ढोंग असेल कदाचित.!'

कुणाल त्यांचं म्हणणं झिडकारत म्हणाला,'शक्य नाही! ते कसं आणि का म्हणता हे मला कळत नाही, पण तुमचं म्हणणं ढोंग नसतं, प्रामाणिक असतं, मनापासून असतं..!'

त्यामुळं बाबांचा आवाज क्षणभर जड झाला. त्यांना कुणालची तळमळ, प्रामाणिकपणा कळत होता. एकाच वेळेला जगातल्या विरोधाभासांपासून लोकांच्या खोट्याखोट्या, मतलबी, ढोंगी वागण्यांपर्यंत असंख्य गोष्टींचा त्याला त्रास होत होता, सात्त्विक संताप येत होता. तरीही, त्याचा त्याअर्थानं, तोल गेलेला नव्हता. तो जितक्या ठामपणानं जगातल्या चुकीच्या वाटणाऱ्या गोष्टींवर चिडत होता, तितक्याच ठामपणानं तो बाबांची आनंदी प्रतिक्रियाही मान्य करीत होता.बाबांवरची त्याची श्रद्धा अढळ होती. त्यामुळं, असला मुलगा आजच्या काळात आपल्या भाग्यात असावा, याबद्दल त्यांना धन्य वाटत होतं.

दुसऱ्या बाजूला, त्याच्या वयाला अनुसरून त्याला वाटणारी चीड - तीही ते समजून घेऊ शकत होते. त्यामुळं त्याला होणाऱ्या त्रासाशी ते सहमत असले, तरी त्याबद्दल त्यांना वाईटही वाटत होतं. कारण, ती त्याची तशी चूक नव्हती, हे ते जाणून होते.

'थँक्स कुणाल.! जगाला मी ते 'छान' आहे असं म्हणतो आहे, तेही तुला मनापासून मान्य आहे..ही केवढी गोष्ट आहे..!'

'ते नक्की बाबा..! पण, तिकडं दुधाच्या पिशव्या पाणी भरून रिपॅक होतात, त्यात घातक युरिया मिसळला जातो. कलिंगडांना काय, फळांना काय - इंजेक्शनं देऊन गोडवा काय आणतात, कलर काय आणतात..आपल्या जिवाला घातक ठरणारी कीटकनाशकांची फवारणी केलेली पिकं पोटात पचवतो आहोत. साध्या केळ्यांपासून आंब्यापर्यंत आणि तांदुळांपासून डाळींपर्यंत सगळ्यांना पावडरच पावडर.. त्यात पुन्हा ठरवून मिसळलेले खडे आपण धान्याच्या भावानं घ्यायचे. मेण लावलेलं वांगं,आम्ही कृष्णाकाठचं म्हणून जादा भावानं विकत घ्यायचं..!'

'..हो,हो,हो जरा थांब.. हे बरचसं सगळं मला ठाऊक आहे. ते चांगलं नाही हेही मला मान्य आहे..' बाबा.

'अहो बाबा, एवढं नाही. ऑफिसच्यावतीनं मी फाईव्ह स्टारमध्ये जेवायला गेलो. मला पानात टाकायची सवय नाही. तुमचे संस्कार..! इतरांनी इतके पदार्थ मागवले होते, मलाच लाज वाटली की, हे लोक अनेक दिवसांचे उपाशी आहेत की काय.. पुन्हा, जो तो जेवायचं तेवढंच जेवला आणि सगळे पदार्थ पानात अर्धेअर्धे टाकून गप्पा छाटीत बसला आणि शेवटी फिंगरबाऊलमध्ये हात बुचकळून, अन्न टाकून बेपर्वाईनं निघून गेला. मलाच जाताना अपराधी वाटायला लागलं, म्हणून मी वेटरला बाहेर पडताना तसं बोलायला गेलो. तो म्हणाला,'ये तो आजकी सभ्यता है..आपही तो अजीब लगते है..नेव्हर माइंड..' मला बाहेर पडताना खजिल झालं, पण संतापही आला..'

'मला दिसत होतं, या फेकून दिलेल्या अन्नांत आमच्या कामगारांचं एका दिवसाचं जेवण नक्की झालं असतं.. एका कलिगला सांगायला गेलो, तर बयेनं काय म्हणावं, 'टेक इट ईझी

कुणाल..डोण्ट बी इममॅच्युअर ॲण्ड टू सेन्सेटिव्ह. गेट ऑन विथ द ट्रेण्डस्..!'

'कुठून या बयेला म्हणायला गेलो असं झालं! म्हणजे, ही काय मॅच्युरिटीचं मंदिर?आणि मी काय मॅच्युरिटीचा दगड?'

बाबा म्हणाले,'असा एकदम दगडफेकीवर येऊ नकोस. सध्या ती मॅच्युअर असण्याचा काळ आहे. ती सीनिअर आहे ना तुला..!'

'हेच ते गोंधळ अन् विरोधाभास..! पण ही बया?'

'अरे, ती बया मला माहीत आहे.. नीलांबरी ना ती?तिच्या बाबांनी किती हलाखीत दिवस काढले..!'

कुणाल त्यांना अडवीत म्हणाला,'हिलाच शाळेची पाटी, पुस्तकं, दप्तरं..'

'आणि युनिफॉर्मपासून इतर ड्रेससुद्धा आपणच त्या काळी दिले, असंच ना?' बाबा.

'बघा, आता हे सगळं तुम्हाला माहीत आहे. तरी तुम्ही शांतपणे पुन्हा तिच्याच बाजूनं बोलता आहात. मला कळत नाही ते हेच..!'

तरीही शांतपणे बाबा म्हणाले,'तू आज तसा रिलॅक्स आहेस ना? तुझं काय ते गिटारबिटार नाही ना आज?'

'नो..असलं तरी मी जाणार नाही.! असल्या जगात मला गिटार वाजवायचीसुद्धा इच्छा होत नाही..!'

'ते बघू आपण..तू मोकळा आहेस ना आज?आपण निवांत चक्कर टाकायला जाऊया..!' बाबा.

'जाऊया.. अवश्य जाऊया.. पण त्यामुळं हा जगातला गोंधळ, विरोधाभास कमी होणार नाही, हे मात्र लक्षात ठेवा हं.!'

'न होऊ दे..तो गोंधळ,त्रास,विरोधाभास तसाच राहू दे..

आपले पाय तरी मोकळे होतील..बाहेर आत्ता किती छान, गार वारं सुटलं असेल..!'

तरी ठाम सुरांत कुणाल निघताना म्हणाला,'गार वारं सुटलंही असेल, पण ते काही आपल्यासाठी सुटलेलं नाही..!'

'बरंऽ आपल्यासाठी नसेल, त्या नीलांबरीसाठी असेल! ते आपल्याला मिळतं का ते तरी बघू?'

'निघताना तरी शुभ बोलावं बाबा..तिचं नाव घेतलं तरी ते सुटलेलं वारं बंद पडेल.. नाहीतर ते सुटलेलं वारं अडवून ती कुठंतरी नेमकी उभी असेल..!'

बाबा म्हणाले,'एवढी सीनिअर नाहीये ती..ती बसली असेल टीव्हीसमोर आईसक्रीम खात, नाहीतर बीचवर पोचली असेल..आणि कुणाच्यातरी खर्चानं भेळ खात असेल, अरे ती ट्रेण्डी आहे ना..! '

बाहेर पडताना प्रथमच कुणाल म्हणाला,'बाबा, हे मात्र तुमचं जजमेंट बरोबर आहे..'

बाबा हसत म्हणाले,'बघ, जरा घराबाहेर पडलो तर जगात काहीतरी बरोबर आहे असं दिसायला लागलं..!'

चालता चालता कुणाल म्हणाला,'हं, थांबा बाबा.. मला गुंडाळायला लागू नका.. अजूनही जगात चुका आहेत, ते बरोबर नाही. विषमता आहेत, विरोधाभास आहेत.!'

बाबा म्हणाले,'तू एवढा मोठा हुशार आहेस, आयआयटीवाला! मी तुला काय गुंडाळणार? त्यात पुन्हा मी थोडा भिडस्त आहे. त्यामुळं मी आपलं सगळ्यांना छान म्हणतो, बरोबर आहे की नाही?'

कुणाल म्हणाला,'मी ओळखून आहे. तुम्ही भिडस्त, घाबरट वगैरे अजिबात नाही.. पण, तुम्ही हे सगळं येईल तसं समजून घेत

काळाबरोबर कसं जाता आणि न पटणाऱ्या गोष्टींचं नक्की काय करता आणि आनंदात कसे राहता, हे मात्र मला कळलेलं नाही..'

'अरे, कळून घेतलंस तर या जगात तसं न कळण्यासारखं फार काही नाही..त्यात बदल करणं, स्वीकार करणं - असल्या गोष्टींत मात्र फरक राहू शकतो.'

'म्हणजे कसं?' कुणाल.

'आता मगाचची चहाचीच गोष्ट घे. मी दोन्हीलाही छान म्हटलं. ते तुला पटावं, असं माझं म्हणणं नाही. पण समजून घ्यावं, असं मात्र माझं म्हणणं आहे.' बाबा.

'तसं, या एवढ्याशा गोष्टीत समजून घेण्यासारखं काय आहे? सकाळचा आईचा होता, अर्थात बेचव होता. जात नव्हता. संध्याकाळी मी दमून आलो, त्यावेळी ती भजनाला गेली होती. तुम्ही घरात होता. तुम्ही रसिकपणे तो चहा केलात, त्यामुळं तो नेहमी होतो तसा उत्तम झाला, ही वस्तुस्थिती आहे. ती समजून घेऊन, मी म्हणतो ते मोठे प्रश्न कसे सुटणार?'

'असं बघ..जगात अनेक माणसं आहेत. तसंच आम्ही दोघंही आहोत, तूही आहेस. असं गृहीत धरू की, तिघांनाही एकच वस्तू बनवायची आहे, तीही त्यातल्या त्यात चांगली बनवायची आहे. तसा तर, तूही कधी वेळ असला तर बनवतोस, तोही छान असतो..!'

कुणाल म्हणाला,'तुम्ही काही म्हणा.. तो तुमच्याएवढा छान नसतो.आता आईच्याएवढा 'छान' नसतो मात्र पिण्यासारखा असतो, एवढं ठीक आहे. पण ते तीनही 'तितकेच' छान नसतात हे नक्की आहे. हे तुम्हालाही ओळखतं. मग असं म्हणून यातून काय सिद्ध होणार?'

बाबा म्हणाले,'तेच समजून घेऊ.आपण तिघंही एकाच घरात

आहोत, साधारण एकच जीवन जगतो. आपण केलेली वस्तू एकच आहे, तरीसुद्धा एवढ्याशा वस्तूत एवढा फरक आहे. ही सुरुवात आहे. पुढच्या फरकांचा आत्ता विचारच करायला नको. पण विचार केलास का, की इतकी साधीशी वस्तू - एकाच घरातली, साधारण सारखी माणसं, साहित्यसामग्री तीच, वेळ तोच - तरी तीन माणसं तीच वस्तू तीन प्रकारची बनवतात. हा फरक का पडावा?असा विचार केलास, तर अनेक गोष्टी समोर येतील..!'

'पाणी, साखर, दूध, पावडर - हे सगळे घटक सारखेच आहेत. तरी प्रत्येकाच्या प्रमाणात फरक,मिसळण्यात फरक, वस्तू एकत्र करण्याच्या क्रमात फरक, वस्तूंचा वापर करण्यात फरक, उकळण्यात फरक..बाप रे..तसे बरेच फरक आहेत..!' कुणाल.

बाबा त्याला थांबवीत म्हणाले,'अरे उकळल्यावर, एखादं मिनिट त्यावर झाकण ठेवून मग तो गाळणं आणि उकळल्या-उकळल्या तो गाळणं, यानंसुद्धा चवीत बारीक फरक पडतो. आता अख्ख्या स्वयंपाकाचं काय होत असेल?'

'ते तर मला ठाऊकच आहे. म्हणून तर मी शक्यतो कंपनीतच जेवतो..!'

'तुला एक उपाय आहे, म्हणून तू करतोस.. आम्ही बाकीच्यांनी काय करावं? यातली गंमत जाऊदे. पण आता हा फरक तू कसा समजून घेणार आणि या साऱ्यात तू कोणता बदल सुचवशील? माझे तसे प्रयत्न करून झाले आहेत, म्हणून तुला सल्ला विचारतो.'

'बाबा, मला ते कळलं. माझी फिरकी घेऊ नका!'

'आता आणखी एक मूळ मुद्दा बघ. मुळात, आपल्या तिघांचेही प्रयत्न ही साधी चहासारखी वस्तू चांगले करण्याचेच

आहेत. मग खरंतर, तुझ्या लॉजिकप्रमाणं सगळं चांगलं आणि सारखंच झालं पाहिजे!' बाबा.

'तसं ते होणार नाही, अगदी माझ्याकडूनही होऊ शकत नाही.' कुणाल.

'का बरं? आपण सगळे सारखेच आहोत. ध्येय छोटंस असू दे, पण एकच आहे. वस्तूंची अनुकूलता आहे. कौशल्याचाही फारसा प्रश्न नाही. तरीही ती एकच आणि त्यातही चांगल्या दर्जाची वस्तू, बनू शकत नाही. त्यात किती फरक पडतात, हे तू पाहिलंस. थोडा आणखी विचार कर..मुळात, खूप फरक असलेल्या तीनही वस्तू मला मात्र छान वाटत आहेत.'

'हेही खरं आहे..पण मग तो तुमच्या मनाचा मोठेपणा समजायचा का?'

'ठीक आहे. थोड्या प्रमाणात तोही फरक आपण गृहीत धरू. पण त्यामुळं, जगातल्या आत्तापर्यंतच्या फरकांत आणि विरोधाभासांत भर पडते आहे, हे मात्र खरं.. तरीसुद्धा तोही फरक, विरोधाभास आपल्याला गृहीत धरावा लागेल. मला तर वाटतं, तू आणखी पुढं जाऊन विचार कर. आईला तर तिचा चहा छान वाटत होताच, तो तू कौतुकानं पितो आहेस, असंही वाटत होतं. त्यातही तुझ्या लक्षात येईल की, त्यापेक्षा तू कप विसळून ठेवलास, याचं तिला फारच कौतुक वाटत होतं. त्याची खरी कारणं तुला माहिती आहेत. असू दे. पण तू इतके दिवस सांगूनही जी गोष्ट केली नाहीस, ती एक दिवस केल्याबद्दल तिला जे कौतुक वाटलं, त्याच्या आनंदात ती माझ्यासकट सगळ्यांशी किती चांगली वागली, माहितीये..!'

'असेलही.. मी ते समजू शकतो. पण हे सगळं आणखीच विचित्र आहे आणि गोंधळात टाकणारंही आहे. तुम्हाला मला काय

सुचवायचं आहे?' कुणाल.

आता रस्त्यावरून जाताना अंधार पडत चालला होता. रस्त्यावरचे काही सोलर पथदिवे लागले होते. मधूनमधून दुतर्फा अशोकाची उंच झाडं होती. इतर काही नेहमीच्या उंचीची, काही लहान, काही मरगळून गेलेली. रस्त्यावरून दोन्ही बाजूंनी आपल्याच नादात गप्पा मारत जाणारी जोडपी भेटत होती. मित्रांचे ग्रुप पास होत होते. कोणी दमलेले मजूर पाय ओढीत घराकडं निघालेले होते.

थोड्या अंतरावर रस्त्याकडेला एक बाग लागली. त्यात, आता विशेष काही काम, ध्येय नसलेल्या आणि नकोही असलेल्या - मंडळींची गप्पाष्टकं रंगली होती. खाण्यापिण्याच्या वस्तू त्या कोंडाळ्यात फिरवल्या जात होत्या. अशाच दुसऱ्या कोपऱ्यातल्या मंडळींच्या गाण्यांच्या भेंड्या चालू होत्या. बहुधा, एकाच गायकाच्या गाण्यांच्या भेंड्या असाव्यात. कारण, त्यांचे चढत चाललेले आवाज ऐकू येत होते.'हे किशोरचंच गाणं आहे.' सगळीच मंडळी स्वतःला तरुण मानणारी पण वृद्ध असल्यामुळं आग्रही होती. त्यामुळं दुसरा आवाज आला.'नाही.. हे गाणं त्याचं नाही.'तोवर पुन्हा पहिल्याचा आवाज आला 'आहे आहे,आहे! मी ते सिद्ध करीन..!' बाकीचे काही आवाज यांच्या बाजूनं वाढले, काही दुसऱ्यांच्या बाजूनं वाढले.

कुणाल बाबांबरोबर शांतपणे चालत जात असल्यामुळं ते ते सारं ऐकायलाही येत होतं, मागंही पडत होतं. तोवर उजव्या बाजूच्या कडेनं एक मनुष्य लांबून हातवारे करीत येत असलेला दिसला. कडेचा अंदाज न आल्यानं तो साईडपट्टीला अडखळून खाली पडला. दोघांच्याही मनात क्षणभर काही करावं की काय असा विचार येतो तोपर्यंत, मागून येणाऱ्या व्यक्तीनं, ती बहुधा त्याची पत्नी असावी,

त्याला गाठलं आणि हात देऊन पुन्हा उभं केलं. ती दोघंही जाताजाता यांना पास झाली. ती पत्नी म्हणत होती,'तुम्हाला शंभरवेळा सांगितलं असेल, निदान माझ्याबरोबर जाताना ते ईअरफोन घालून गाणी ऐकत जाऊ नका..! आत्ता खड्ड्यात पडला असता म्हणजे काय झालं असतं?'

बाबा आणि कुणाल यांनी एकमेकांकडं बघितलं. तोवर ते दोघं दुसऱ्या बाजूनं पास झाले. नवऱ्याच्या कानांत ईअरफोन तसेच होते, त्यामुळं अर्थातच, ती काय म्हणाली ते त्याला ऐकूच गेलं नाही, हे दिसत होतं. कारण, पुन्हा तो हातवारे करीत चालू लागला होता आणि ती डोक्यावर हात मारून त्याला गाठायचा प्रयत्न करीत होती.

बाबा म्हणाले, 'इथं एक कट्टा मोकळा दिसतो आहे.. आपण बसूया का थोडावेळ?'

कुणालच्या चेहऱ्यावर आता एवढा त्रागा, चीड नव्हती. मात्र तो शांतपणे म्हणाला,'कान,डोळे बंद करून असं फिरणं काही शक्य नाही. त्यापेक्षा, निदान बसून काय कानांवर येईल, जे काय दिसेल ते पाहात राहणं परवडलं! निदान आपल्या पायांना तरी विश्रांती राहील!'

बाबा म्हणाले,'जग हे असं सगळ्यांचं आहे. आपल्या घरातल्या तिघांत एका वस्तूच्या बाबतीत ते कशानंच एका पातळीवर येऊ शकत नाही, सारखं होणं शक्यही नाही. आणि आता तुझ्या लक्षात आलं असेल, की तेवढ्या बाबतीतसुद्धा त्याची तशी गरजही नाही. गरज तर, तुझ्यासारख्या उच्च शिक्षितांचीही आहे, इकडं भजनीमंडळांचीही आहे, अशा बागांचीही आहे, त्यांतल्या गप्पाष्टकांचीही आहे, भेड्यांचीही आहे आणि त्यांतल्या भांडणांचीही आहे..'

'..एवढ्या एक कप विसळण्यावर आईचा सगळा दिवस माझ्याशीच नव्हे, शेजाऱ्यापाजाऱ्यांशी वागतानासुद्धा उत्साहात गेला. खरंच गेला! गंमत म्हणून सांगतो की, याला काही फार मोठं कार्यकारण आणि तर्क लागू होत नाहीत. एक कप विसळून, दिवस इतका चांगला जात असेल, तर तूच काय, मीसुद्धा रोज कप विसळायला तयार आहे!'

'तसं होणार नाही बाबा, हे माझ्या लक्षात आलंय..'

'का बरं?'

'म्हणजे ते असं आहे, तुम्ही काय, मी काय, आजपासून कप विसळले, तर उद्यापासून नुसता स्वयंपाकच करायला लागेल असंही नाही, ते भांडी घासण्यापर्यंत जाईल..!'

'आता तुला जगाच्या प्रश्नांत थोडी इनसाईट आली बघ. त्या माणसांच्या गप्पांना, भेंड्यांना बालिश म्हणूनही चालणार नाही. ते बंद करूनही चालणार नाही. कारण, त्यांच्यापुढं त्याच्यापेक्षा मोठं काही करण्यासारखं नाहीये. उलट, हे बंद केलं तर त्यांच्या घरातल्या मुलांना, सुनांना ते असे काही व्याप करून ठेवतील की, तुलाही वाटेल हेच चांगलं आहे, विधायक आहे, बरोबर आहे, उत्तम आहे! आणि मला सांग, ते गृहस्थ कानांत ईअरफोन घालून पडले खरे, पण त्यामुळं, बायकोला त्यांना झापण्याचा केवढा आनंद मिळाला, तो त्यांना माहीत आहे. ईअरफोन काढून जे ऐकायला लागेल, ते ऐकण्यापेक्षा गाणी ऐकताहेत हे चांगलं आहे का नाही?'

कुणाल खरंच समजुतीनं म्हणाला,'खरं आहे..खरं आहे. आता मी समजू शकतो. जग काही मला वाटत होतं, तेवढं विचित्र, ॲबसर्ड नाही!'

बाबा म्हणाले,'फक्त केवळ आपल्याच चष्म्यातून पाहायचं

ठरवलं, तर तसं विचित्र वाटतं, विरोधाभास दिसतात, ही नफाखोरी दिसते, फसवणूक दिसते, चोऱ्यामाऱ्या दिसतात. मी त्यांतल्या अन्याय्य किंवा वाईट गोष्टींची तारीफ नाही करत, हे तुला माहीत आहे. परवा आपल्या शेजारी दरोडा पडला. तुला त्या चोरांची चीड आली, मला मान्य आहे. पण..'

'आता तेवढं नाही वाटत मला! कारण, आता मी तेवढीच घटना बघत नाही. आजवर, त्यांनी किती लोकांना नाडलं, अमर्याद लोभ केला, अतिरिक्त संचय केला, ते आता माझ्या लक्षात येतंय. आज एवढं होऊनसुद्धा, त्यांच्या वृत्तीत काही फरक पडला नाही, आणि अजूनही इतकं आहे जे तीन पिढ्यांना पुरेल. चोरी बरोबर नसेल, पण भुकेची भ्रांत असलेल्या आणि त्यासाठी जीव धोक्यात घातलेल्या काही गरीब जिवांना, देवानं मिळवून दिलेला तो न्याय असेल, असंही मला आता वाटतं..!'

'आता हा देव कुठला आला, रे? जगात गरीब -श्रीमंत, राजा-रंक, शोषक-शोषित,प्रामाणिक-अप्रामाणिक,चांगलं-वाईट - असले असंख्य विरोधाभास आणि गोंधळ निर्माण करणारा तोच का रे हा देव?' बाबा म्हणाले.

'आलं लक्षात बाबा.. आता मलाच समोर दिसतं आहे. आमच्या त्या आयआयटीच्या विश्वातल्या विद्यार्थ्यांच्या जगातसुद्धा असंख्य फरक होते. हेही माझ्या लक्षात आलं, की त्यावरून होणारे मत्सर,असूया,राग - हे घडले खरे. पण ते काही या देवाचं देणं नव्हतं. ते आमच्याच असमंजसपणाचं पीक होतं. ज्यानं अनेकांच्या आयुष्यात काळोख आला, संबंध दुरावले. हे तिथंच कळलं असतं, तर कदाचित आमचं, निदान माझंतरी आयुष्य आणखी बदललं असतं. मी खूप शांत झालो असतो. '

'खरं समजून आलं, तर तू अजूनही कितीतरी चांगलं, विधायक जगू शकतोस. अरे, कितीक गोष्टी समजावून घेण्यासारख्या आहेत. आपला तो आजचा चहा! तीनही एकाच चांगल्या दर्जाचे असते, तर चांगलंवाईट काही कळलंही नसतं. चांगल्याचा म्हणून, काही वेगळा आनंदही घेता आला नसता. कुणी अप्रगत राहावं, असं तर निसर्गही म्हणत नाही, देवही म्हणत नाही. करायची ती प्रगती करा, पण ते असं सगळं बाह्यतः समसमान, सारखं होणार नाही आणि त्यातच मजा आहे. '

कुणाल म्हणाला,'आत्ताच पाहिलेल्या छोट्याछोट्या झुडुपांचं-झाडांचं सौंदर्य, मला आपण शांतपणे चालल्यामुळं लक्षात आलं. मरगळलेल्या रोपाबद्दलही या हिरव्यागार झाडामुळं विचार मनात आला, सहानुभूतीही..!खरं तर, अशोकाच्या झाडांच्या उंचीकडेही या मध्यम झाडांमुळं लक्ष गेलं..!'

'अरे..एखादी संध्याकाळसुद्धा आपल्याला आयुष्याबद्दल, जगाबद्दल जागं करायला पुरू शकते. पण हे अवाढव्य जग आणि त्याअर्थानं, सतत प्रवाहित असलेलं अपरिमित आयुष्य कळून घ्यायला, चांगला अभ्यास आणि समजूत लागेल. अजून एक साधीशी गोष्ट बघ. तुला जे विरोधाभास वाटतात, ती विविधता आहे. ते विरोधी नाहीत, निसर्गाचे पूरक अविष्कार आहेत.'

'कसे?' कुणाल.

'उंचीत दोनतीन प्रकारचे फरक असलेली झाडं आपण पाहिली. त्याच्यावरचा कोवळा पाला, पानं खाणारे शेळीसारखे जीव एकाच उंचीचे कुठं असतात? दिसताना वृक्षांच्या उंचीत फरक दिसेल, विरोध दिसेल, पण निसर्गाला सगळ्याच जिवांना जगवायचं आहे. शेळीला तिच्या उंचीवर पाला ठेवला आहे. उंच झाडांवरची पालवी

आणि फळं वानरांसाठी..! तसं पाहिलं तर, थंड-उष्ण,गार-गरम,ऊन-पाऊस,उंच-सखल असे अनेक विरोध तुला बाहेरही दिसतील, माणसांच्या मनात, वृत्तीतही दिसतील. निसर्गाचं काम तर विविध आहे, विरोधी नाही, पूरक आहे..! '

कुणाल म्हणाला,'मग ते अन्न वाया जाणं, ढोंग, खोटी प्रतिष्ठा हेही बरोबर ठरेल का?'

'ते बरोबर ठरत नाही,पण क्षितिजापलीकडं, निर्भेळ सत्याकडं जायची शक्ती, म्हणजे खऱ्या अर्थानं मॅच्युरिटी दिलेली असताना, तिची ओळख नाही म्हणून, कळत नाही म्हणून, किंमत नाही म्हणून - काही म्हण, मनुष्य असले देखावे करीत राहणार. आपण तर, त्या सगळ्या जगात बदल करण्यासाठी जन्माला आलो नाही आणि ते करणंही शक्य नाही. हे आदर्श नसलं, तरी समजून घे. या असंख्य इममॅच्युअर जगामुळं मॅच्युअर लोकांना सोन्याची किंमत आहे. ते आनंदात आहेत आणि तो मिळवू इच्छिणाऱ्यांना ते सहज मदतही करतात आणि उरलेलं...'

'मी सांगू?' कुणाल म्हणाला.

'सांग ना..' बाबा.

'आणि उरलेलं.. छान म्हणून सोडून देतात..!'

बाबा टाळी देत म्हणाले,'ये हुई ना बात..! आता तुला काय सांगण्यासारखं राहिलंच नाही..चल, जाताजाता आपल्या बापुरावांची तब्येत बघून जाऊया का?'

'हो. अवश्य जाऊया.'

बापुराव कॉटवर झोपलेले होते. एकदम बाबांना बघून त्यांची बसल्याजागीच धावपळ उडाली. घरात तशी दुरवस्थाच होती.

कुणालच्या डोळ्यांसमोर बाबांचे आणि बापुरावांचे जुने

ऋणानुबंध चित्रासारखे तरळून गेले. चांगले दिवस परिस्थितीनं दाखवले. त्यावेळी, ऐन उमेदीपासून बापुरावांनी केलेली मदत, त्यांचा यांच्या घरातला वावर आणि त्यांची आजची ही परिस्थिती - एरवी हा त्याला निसर्गाचा अन्याय, विरोधाभास वाटला असता. त्याच्याच बरोबरीची दोन मुलं, मुलीपेक्षा मुलावर लागलेल्या सगळ्या आशा, खूप शिकून परिस्थिती आणखी सुधारून, तो सांभाळणार हे स्वप्न, एका क्षणात त्याला जगातून घेऊन जाणाऱ्या अपघातानं पुसून टाकलं.

बाबा त्यांच्याशेजारी कॉटवर टेकत म्हणाले,'महिन्याभरात काही मला येणं झालं नाही. पण त्यापेक्षा तुमची तब्येत आता अधिक छान वाटतेय. पोरीनं तर नाव काढलं. पहिली आली ती..नोकरीचं जमलं का कुठं तिचं? आत्ता घरीच असते ना ती?'

बापुरावांना या भेटीनं उत्साह आला. ते म्हणाले, 'आत्ता तुमचा पाय आत पडेपर्यंत इथं होती. अने.. त्यांनी त्यातल्या त्यात जोरात हाक मारण्याचा प्रयत्न केला.'

'असू दे..असेल इथंच कुठंतरी.एवढंसं घर.जाणारे कुठं?'

'तुम्ही पाणीतरी घ्या तोवर.'म्हणत हळूहळू जाऊन त्यांनी पाण्याचा तांब्या आणि एका वाटीत साखर दोघांच्या समोर स्टुलावर ठेवली. आणि म्हणाले,'बाबा, घ्या तोवर. तुम्ही नाही आला, तरी तुमचा माणूस येऊन जात असतो. ही साखर तरी तुमचीच आहे!' ते कुणालकडं पाहात म्हणाले.

कुणालनं बाबांकडं पाहिलं. बाबांनी त्याची नजर टाळली. त्यानं ओळखलं. हे बाबांच्या मिटल्या मुठीतलं आणखी एक दान असणार..तेवढ्यात बापुराव म्हणाले,'ह्यांना आणलं हे बेष्ट केलं..!'

कुणालला क्षणभर अवघडलं. पण तो म्हणाला,'बापू काका, मी अहोजाहोत कधी गेलो? अलीकडं शिक्षणातनं, नोकरीतनं यायला

नाही जमलं. चुकीच्या विचारानं हवेत गेलो असतो. पण बाबा आहेत ना..! त्यांनी दोरी धरून बरोबर जमिनीवर उतरवलं. आजच. त्यामुळं, या माझ्या जुन्या घरी मी किती वर्षांनी आलो!'

बापुराव म्हणाले,'वा, वा, कुणाल! केवढी आठवण ठेवलीस..बाबांचे उपकार आहेत. नाव काढशील! छान, छान!' असं म्हणून त्यांनी पुन्हा एकदा साखरेची वाटी त्याच्यापुढं केली. 'ही साखर तुमचीच आहे, हे खरंय, बरं का!'

'आणि हा चहाही तुमचाच आहे बरं, घ्या बाबा!' बापुरावांची मुलगी, अवनी आत येताना म्हणाली.

चहापाणी झालं. जुन्याजुन्या आठवणी निघाल्या. त्या छोट्याशा घरातले परिस्थितीनं मरगळलेले दोन्ही जीव जणू पावसाची सर येऊन जावी आणि झाडं, पानं टवटवीत व्हावीत तसे उजळले.

'येतो बापुराव.. काळजी घ्या.' बाबा.

अवनी म्हणाली,'आणि लवकर लवकर येत जा. तुम्ही आलात, की आमचे बाबा औषधाशिवाय बरे होत असतात. तुमच्या गडबडीतून वेळ काढून या. पण या मात्र..!'

बाबा आणि कुणाल पुन्हा त्या रस्त्यानं आपल्या घराकडं परतले. बाबा म्हणाले, 'काय म्हणतंय आता तुझं जग? विरोधाभास, अन्याय, गोंधळ?'

कुणाल म्हणाला,'त्या बयेला मी मॅच्युरिटीचं मंदिर म्हटलं ते बरोबर आहे की नाही, हे काही मला सांगता येत नाही. पण मी मात्र मॅच्युरिटीचा दगड निघालो ही गोष्ट खरी..! फार वेळ गेला संध्याकाळचा आज, रात्र पडली. पण तुमच्यात दगडाची मूर्ती करायचं कौशल्य आणि सामर्थ्य आहे, हे खरं..! बाहेर पडल्यापासून आत्ता या घरातून बाहेर पडेपर्यंत अलगद, सफाईदार घाव बसले. माझं सांगता

येत नाही, पण तुम्हाला यश आहे म्हणून मूर्ती होईल, असं मात्र वाटायला लागलं!'

बाबा हसत म्हणाले,'तू तर आता मॅच्युअर माणूस आहेस, तर आत्ता शेवटी तुझी प्रतिक्रिया काय झाली?'

'म्हणजे, या बापूकाकांच्या घरच्या भेटीबद्दल?' कुणाल.

बाबांनी होकार दिल्यावर तो पुढं म्हणाला,'ती भेट मला जरा अनपेक्षित होती. एक नक्की की, तुम्हाला महिनाभर त्यांच्याकडं जाणं जमलं नसेल, पण त्यांच्या संबंधांचा धागा तुम्ही वर्षांनुवर्ष, अगदी आजअखेर किती जपलेला आहे, याची जाणीव झाली. त्या दोघांच्या चेहऱ्यावरचे भाव, तुम्ही जपलेल्या माणुसकीचा आनंद बोलत होते. त्याक्षणी, मला अशा तुम्ही जपलेल्या कित्येक संबंधांची आठवण होऊन गेली. खरं सांगतो, या घराचा संबंध तर, त्या अवनीची आई असल्यापासूनचा होता. मध्ये कित्येक वर्षं मी माझ्या जगात इतका गुरफटून गेलो होतो की, मी हा आपल्या कुटुंबांचा ऋणानुबंध विसरून गेल्याची खंत वाटली.'

'नेव्हर माईंड कुणाल..! तू करिअर, त्यांतले अनुभव, तिथले कलिग, मित्रमंडळी, बॉस, कामं, टारगेट्स्-अशा एवढ्या मोठ्या जगात वावरत होतास की, ते तसं जपणं अवघडच होतं.'

'बाबा, तुम्ही सांभाळून घेत आहात, ते ठीक आहे. पण खरं तर, यांत तसं काहीच अवघड नव्हतं. हे संबंध जुने होते, वेगळे होते, जिव्हाळ्याचे होते. मी त्याअर्थानं खूप सुस्थितीत होतो. मध्यंतरी त्यांच्यावर झालेल्या प्रत्येक आघातात, आलेल्या प्रत्येक दुःखात तुम्ही त्या काळात ऑफिस सांभाळूनसुद्धा देत आलेली साथ, त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होती आणि रोज घरात तुम्हाला भेटणाऱ्या आणि त्याचा मनमोकळा आनंद घेणाऱ्या मला मात्र, त्याची काहीच जाणीव

असू नये, यानं मला अस्वस्थता आली.'

'अरे केवढ्या केवढ्या गोष्टी कळताहेत तुला..! पण तुलाही सतत बिझी-व्यग्र ठेवणाऱ्या किती गोष्टी होत्या. हे जग, त्यातले अन्याय, गोंधळ, विरोधाभास, ॲबसर्डिटीज्..'

'बस, बस, बस.. जगात काही गोंधळ वगैरे नव्हते, गोंधळात मीच होतो. उगीच भ्रमत राहून सगळ्या जगाला नावं ठेवीत, वर तुमच्याशी वाद घालीत, मी फुकट पाचसात वर्षं काढली. आता एकदा खरं आकलन झाल्यावर, समर्थन करण्यात काही अर्थ नाही. इतक्या विपरीत परिस्थितीत, कुठली तक्रार न करता,कुणाला दोष न देता, काका आणि अवनी कोंड्याचा मांडा करून इतक्या आनंदात कसे राहू शकत असतील हो बाबा?'

'विचार केला पाहिजे! निदान त्यांनी, ज्यांच्यावर उपकार केले आणि ज्यांनी त्याची साधी जाणीवही ठेवली नाही - अशा लोकांपासून नशिबापर्यंत-कुणालाही दोष देणं त्यांना शक्य होतं, रास्तही आहे. पण इतक्या वर्षांत मी नाही ऐकलं तसं काही..!'

बाबा पुढं म्हणाले,'मी एकदा बापुरावांना सहज गप्पांत म्हटलं होतं, तुम्ही कुणासाठी काय केलं असेल ते खरंतर तुम्हाला माहिती, पण मी तुम्हाला ज्यांच्यासाठी करताना पाहिलं, ते लोकही कसली जाणीव ठेवताना दिसत नाहीत. उलट, कृतघ्नतेनं वागताना दिसतात, त्यांचं चुकतं असं तुम्हाला नाही का वाटत, त्यांना रागवावं असं नाही का वाटत?'

'मग काय म्हणाले ते?'

'अरे, त्यांच्याजागी मी असतो तरीसुद्धा समजुतीनं का होईना, दोन शब्द बोललो असतो. पण त्यांनी काय म्हणावं? ते म्हणाले,'असं बघा, आपण दारात बसलो, तहानलेला माणूस तिकडून

आला. पाणी मागितलं. आपल्याकडं होतं. मी दिलं. तहान भागली. तो रस्त्यानं निघून गेला. त्याला तहान लागली, आपल्याकडं होतं, देता आलं, त्याची तहान भागली हे उपकारच म्हणायचे. तहान नसती तरी शक्य नव्हतं, असती आणि आपल्याकडं द्यायला पाणी नसतं तरी शक्य नव्हतं. अशी ती कामं झाली, ही देवाची कृपाच म्हणायची. आता तहान भागलेला माणूस प्रवासात आहे. तो आपल्या रस्त्यानं निघून गेला. आता काय त्याला शोधत जायचंय?''

मी म्हटलं,'बापुराव, फार सोपं करून सांगितलं तुम्ही. बरोबरच आहे ते. पण त्याला काही जाणीव पाहिजे की नाही, एक..! आणि दुसरं असं, की असं करत आपलं पाणी संपलं तर पुन्हा काय करायचं?'

ते निश्चिंतपणे म्हणाले,'तो न्यायला आपल्या दारात आला. द्यायला आपल्या दारात, कोणाला तरी तो देव नाही का पाठवणार? आता म्हणून दाखवणं तुम्हाला आवडणार नाही, पण नड भागवायला तुम्ही नाहीतर तुमची माणसं आज किती वर्षं येतात. म्हणजे ते तेच की..!'

'हे सगळे अनुभव अजबच आहेत, बाबा.. परिस्थिती चांगली असो, हलाखीची असो, जगात वाट्टेल तेवढा गोंधळ असो नाहीतर अंधार असो, श्रद्धेच्या घरोघरी आजही देव नांदतो, एवढं मात्र खरं..! स्वतःची परस्वाधीन तब्येत, ही लग्नाची मुलगी, हलाखीची परिस्थिती - यांतसुद्धा आम्हांला सगळं अनुकूल असतानासुद्धा वाटणार नाही, इतकी देवाची खात्री त्यांना आहे. म्हणून ते निश्चिंत आहेत, आनंदात आहेत. सगळं शिकण्यासारखं आहे खरं..!'

'कुणाल, तू विचार कर, तुला वाटतं परिस्थिती कशीही असली तरी मी तिला छान म्हणतो आणि छान असल्यासारखं

राहतोही. ते मी शाळा - कॉलेजमध्ये शिकलो नाही. अशा बापुरावांसारख्यांकडनं शिकलो. खरंतर, ते जेवढे निश्चिंत आणि आनंदात राहू शकतात, त्याच्यापुढं हे छान राहणं तसं काहीच नाही. म्हणून, अशा माणसांकडं मी आवर्जून जातो. दरवेळेला त्यांच्यातल्या शांतीचे, समजुतीचे, सहनशक्तीचे, समाधानाचे, 'माणसातल्या देवाचे' सुवर्णकण वेचून येत असतो.'

'काही पाट्या टाकून, इकडची तिकडची उत्तरं देऊन डिग्री देणारं हे शिक्षण नव्हे. त्या पोटभरू विद्या. ते चांगलं. ते डिग्री मिळालं की संपलंही जातं. हे माणसातले देवत्वाचे सुवर्णकण वेचण्याचं माझं काम अखंड चालू आहे. इथं शिकलेलं जिवंत आहे, शाश्वत आहे. ते असं कुठंही, कुणाकडंही आणि शेवटपर्यंत चालू राहणार. त्यात आनंद आहे. म्हणून मी आनंदात आहे, छान आहे..'

'अरे, इथं रोजची भ्रांत आहे. अवनी हुशार आहे, चुणचुणीत आहे, व्यवहारी आहे, शिक्षण उत्तम आहे. पण तिला अजूनही नोकरीची कुठं संधी नाही. गेल्या महिन्यात गेलो तेव्हा, ते काहीच म्हणाले नाहीत. तिला घरात वावरताना बघून, तिला काही वाटू नये म्हणून मी खुणेनंच बापुरावांना विचारलं, हिची काहीतरी काळजी केली पाहिजे ना? त्यांचा आवाज जड झाला. पण म्हणाले, तिच्यात काय कमी आहे, ती आपलं घेऊन आली असेलच ना! आणि तुम्हाला माहीतच आहे, काळजी करून होत असतं, तर याच्याआधीच करून मोकळा झालो असतो की डोळे मिटायला! त्यापेक्षा देवावर भार आहे तेच बरं आहे..! '

'बाबा, आजची संध्याकाळ काही वेगळीच आहे. भावनेच्या भरात नाही, पण देवाची व्यवस्था म्हणून तुमच्यामुळं का होईना, मी त्यांच्या दारात चालत गेलो, ते तिच्यासाठी तर नसेल? लोकांना यात

विरोधाभास वाटेलही. पण मला पूरक कृतींचं महत्त्व कळलेलं आहे. मी सेन्सिबल बोलतो आहे ना?'

'नक्की, पण का रे..?' बाबा.

'काय झालंय बाबा, मी गेली पाचसहा वर्षं बरंच नॉनसेन्स बोललो आहे, हे माझ्या लक्षात आलेलं आहे..., आज आत्ता संध्याकाळी बाहेर पडेपर्यंत.. ते तुम्हाला माहीतच आहे. त्यात सुधारणा तर व्हायला हवीच आहे, माझा ती करण्याचा निर्धारही आहे. ते जमलं, तर उत्तमच आहे. पण निदान, आज या कुठल्या विषयाची भर तरी नको. चुकीचं असलं, तर इथंच थांबवा मला. तेच छान राहील..!'

'यात काही विचार करण्याची गरज आहे हे नक्की.. त्यांची गरीबी आहे. तिला नोकरी नाही. समाजातले फरक आहेत. बाकी नातेवाईक - जगाचे प्रश्न आहेत. आणि सगळ्यात मोठं म्हणजे..!' बाबा.

'आमच्या मातोश्री..! हेच ना? इतके दिवस तू लग्नाचा विषय काढून द्यायला तयार नव्हतास, ते एकदम करायला निघालास आणि ते हे असं..! आणि एक आठवडाभर याच्यावर तीचतीच चर्चा..! ते घेईन मी सांभाळून.. आणि तुम्ही आहातच की..!' कुणाल.

'आणखी एक लक्षात ठेव. ती नीलांबरी माहितीये बरं तिला.. नटते ती.. त्यामुळं आईच्या डोक्यात असेल. विषय काढला, तर काय सांगशील?' बाबा.

'तिचं ठरलं केव्हाच, मधली दोन मोडूनपण गेली, म्हणून सांगतो! मग आई हे बरं आहे म्हणेल!' कुणाल.

'हे तर छानच आहे! तू इकडच्या सगळ्यांचा विचार केलास,

हे चांगलं झालं. आपल्याकडचे प्रश्न तुझ्या लक्षात आले, त्याचे मार्गही तुझ्यासमोर आहेत. मला खात्री वाटते, ते यशस्वी होतील..'

'मग तुम्हाला काय अडचण वाटली?' कुणाल.

बाबा म्हणाले,'..अडचण अशी नाही वाटली, पण अजून आपण बापुरावांचा आणि अनूचा विचार यात गृहीत धरलाय. मला वाटतं, त्याची खात्री करणं आवश्यक आहे!'

विचारानं पुढंपुढं जाणारा कुणाल क्षणभर थांबला आणि म्हणाला,'खरं आहे. आपण असंच परत जाऊन खात्री करणं बरोबर होईल का?'

'कुणाल, आयुष्यात पेशन्स् लागतो तो हाच! आपली बाजू बरोबरही असेल, पण इतर बाजू लक्षात घेतल्याशिवाय कधी निर्णयावर येऊ नये, मत बनवू नये.'

दोघं उलट्या पावली परत फिरले. बापुरावांचं घर अजूनही उघडंच होतं. त्यांचा विश्वास बसला नाही. ते आनंदून म्हणाले,'आज काय दोनदोनदा सूर्य उगवण्याचा दिवस दिसतोय!'

बाबांनी थेट मुद्द्याला हात घातला. ते म्हणाले,'थोडं बोलणं राहिलेलं. ते बाहेर गेल्यावर झालं, म्हणून परत आलो. मुलाच्या मनात कधी नव्हे ते आलं आहे. आमच्या तर डोक्यात होतंच..'

पुढचं स्पष्ट कसं बोलावं या विचारात ते जरा थांबलेले असतानाच बापुराव म्हणाले,'देवा, काही अडचण आहे का? आमचं काही चुकलं आहे का?'

अवनीच्याही क्षणभर लक्षात येईना. पण आपली बाजू पडती आहे, कदाचित हे दोघं नुकतेच येऊन गेले,आपल्याकडनंही काही चुकलं असेल, असं वाटून तिनंही सरळपणे, थोड्या अजीजीच्या सुरात विचारलं,'आमचे बाबा म्हणताहेत ते खरं आहे. तुम्ही दोघंही

गेल्या पावली परत आलात, तेव्हा आमचं काही चुकलं असल्याचीच शक्यता जास्त आहे. त्यांचं असो, माझं असो, तुमचा तेवढा प्रेमाचा अधिकारच आहे..!' तिला पुढं काय बोलावं कळेना.

कुणाल आणि बाबांनी एकमेकांकडं पाहिलं. दोघांच्याही चेहऱ्यावरचे भाव सांगत होते, कितीतरी वेड्यावाकड्या, तिढ्या जगातच असलेलं हे जग, किती सरळ, निर्मळ आहे. कुणालनं खूण केल्यामुळं कुणालकडं बघत बाबा म्हणाले,'याला तुम्ही दोघंही लहानपणापासून ओळखता. हे रत्न, तुमचा जावई व्हावं म्हणतं आहे. आता तुमचाच विचार काय तो मनमोकळेपणानं सांगा, एवढंच. काही अडचण वाटली,तर अवनीसाठी याच्यापेक्षा चांगलं बघू!'

त्या दोघांच्याही डोळ्यांत पाणी तरळलं होतं. बापुरावांना ते आवरलं नाही. ते म्हणाले,'नाहीचा प्रश्नच नाही. बाबा, हे रत्न आकाशातलं आहे. आमची उडी तुम्हाला माहीत आहे.' ते बोलत असतानाच अवनी डोळे पुसत आत गेली. बाबा तिच्याकडं बघून थोडे शंकेत पडलेले पाहून बापुराव म्हणाले,'ती दुसरा विचार करणं शक्यच नाही! फक्त एकदम तिचा विश्वास बसणार नाही.' एका हाकेसरशी ती बाहेर आली. तिनं तिघांनाही वाकून नमस्कार केला. बाबांनी तिला स्पष्टच विचारलं,'आहे ना मनासारखं? करूया फायनल?'

'पण..तुमच्या घरी..' अवनी.

'ते बघतो आम्ही. त्याच्यावर विचारही केला आहे. थोड्यावेळानं पटेल, पण पटेल! आणि आम्ही दोघं तसे खंबीर आहोत ना! आणखी काही वाटतं आहे का?' बाबा.

'उगीच त्यांच्या मनाविरुद्ध नको,असं माझ्या मनात आलं म्हणून म्हटलं बाबा.'

'ते बरोबर आहे. परिस्थितीचीही काळजी करू नका..'

अवनीला जरा ओशाळल्यासारखं वाटलं, तरी ती म्हणाली,'अलीकडं इतकी वर्षं आमच्या परिस्थितीची आम्हाला कुठं काळजी घेता आली आहे? हा योग आला, तर तुम्ही घ्यालच आणि नाही आला तरी ती तुम्हीच घेणार, हे मी अनुभवलंच आहे. पण..'

कुणालकडं बघत बाबा हसत म्हणाले,'पुन्हा विचार कर रे बाबा. मी लहानपणापासून ओळखतो आहे. ती हुशार आहे, चुणचुणीत आहे, व्यवहारदक्ष आहे, कुणाच्याही एवढ्याशासुद्धा उपकारांची जाणीव ती कधी विसरत नाही - अशा असंख्य गोष्टी मी पाहिल्या आहेत. पण लग्नाची गोष्ट आणि जन्माचा संबंध यात अजून हिचे काहीतरी 'पण' दिसताहेत बाबा. ते मात्र आता तूच काय ते बघून घे!'

कुणाल क्षणभर गोंधळला. तो काही विचारणार, इतक्यात एकदम गडबडून जाऊन अवनी म्हणाली,'बाबा, तसं नाही. तुम्हाला सगळं माहिती आहे. माझं भाग्य माझ्या दारात चालून आलं, मग माझे असले कुठले 'पण' असतील का?'

बाबांनीही ते आता गमतीनं घेतलं आणि विचारलं,'मग आणखी एक 'पण' पण काय आहे?'

अवनी गंभीर होत म्हणाली,'माझी कुठली अट असणार आहे? पण आमची परिस्थितीही तुम्हाला माहिती आहे. मी खऱ्या अर्थानं फारसं काहीच करू शकत नाही, पण बाबांचा मुलगा आणि मुलगी मीच आहे ना! आज माझी निदान सोबत आहे, घरचं सगळं करते आहे, त्यांचं औषधपाणी आहे. देवदयेनं माझं भाग्य दारात उभं राहिलं, म्हणून मी माझ्या सुखासाठी बाहेर पडले, तर आहे तेवढी सोबतही...?'

बाबांनी फक्त कुणालकडे पाहिलं.

त्याच्या लक्षात आलं. तो पटकन म्हणाला,'याच्यावर विचार करताना, मी हे बाबांशी कधीच बोललो आहे. तू घरात आलीस, की तुझे बाबा आपोआपच आले. माझ्यादृष्टीनं मी त्यांना इथंच नव्हे, तर आपल्या घरी सांभाळीन. इतकंच नाही, तुला नोकरी करायची असली तर लागू शकते. पण त्यांची आणि आमच्या आई-बाबांची काळजी घ्यायची गरज असेल, तर तुला नोकरी करायचीही आवश्यकता नाही. तू आनंदानं घराला आणि या सर्वांना सांभाळू शकतेस. आणखी काही सांगू?'

तिनं मानेनंच नाही म्हटलं. बाबांनी वातावरणात भावनांचा आलेला ताण हलका करत म्हटलं,'मग मगाशी हा विषय निघाल्यावर, तू आत कुठं पळून गेली होतीस?'

'कुठं जातेय? भाग्यावर विश्वास बसला नाही.म्हणून आत देवाला नमस्कार करून आधीच समोर साखर ठेवली आहे!'

'आता तीच सगळ्यांना आणून दे, म्हणजे झालंच की!'

आनंद आणि कृतज्ञतेनं उजळलेल्या त्या घरातून बाहेर पाऊल टाकल्यावर बाबा कुणालला म्हणाले,'शाबास! आता मला तुझ्यात जागा झालेला माणुसकीचा देवाचा कण वेचावा लागणार तर..!' बाबा प्रसन्नपणे म्हणाले.

'ते कण वाढणं फार कठीण आहे, बाबा. पण मी प्रयत्न करीन. एक नक्की, माझ्या आयुष्यात उगवलेली आजची संध्याकाळ आगळी आहे. अविस्मरणीय आहे..!'

***

४. उच्च शिक्षण..?

एक खेडं होतं. त्या खेड्यात चौथीपर्यंतच्या शिक्षणाची सोय होती. त्या खेड्यात एक मुलगा राहात असे. त्याचे आईवडील थोडी शेती, थोडी मजुरी असं करून, कसाबसा प्रपंच चालवीत असत.

हा मुलगा मात्र लहानपणापासून उत्तम बुद्धिमत्ता आणि अभ्यासाची गोडी घेऊनच जन्माला आलेला होता. अत्यंत कष्टाळू असल्यामुळं, त्याच्या शिक्षकांनी त्याला खूप उत्तेजन दिलं. त्यांनी केलेल्या मार्गदर्शनामुळं, तो त्याकाळी चौथीच्या परीक्षेच्या गुणवत्ता यादीत पहिला आला.

आईवडिलांना पुढं फारसं शिकवण्याची इच्छा नव्हती. पण शिक्षकांनी त्यांचं मन वळवलं. असं केलंत, तर तुम्ही इथंच राहाल. तो होतकरू आहे, बुद्धिमान आहे. त्याला पुढं शिकू दे. त्यांच्या सांगण्यावरून त्यांनी शेजारच्या खेड्यातच असलेल्या मोठ्या शाळेत त्याला घातलं.

त्याच्या अंगच्या बुद्धिमत्तेमुळं, कष्टांच्या तयारीमुळं त्यानं तिथं पहिला नंबर कधीच सोडला नाही. सातवीची शिष्यवृत्तीही मिळवली. तो तिथल्या अधिकाधिक बुद्धिमान मुलांच्यात वाढत ज्येष्ठ शिक्षकांच्या संपर्कात आला. अखेर,त्याचं खेड्यातलं शिक्षण संपत आलं. तोपर्यंत, त्याला जगाचं बरंच ज्ञान झालं होतं. प्रगतीची मोठी क्षेत्रं कळली होती.

त्यामुळं त्यानं ठरवलं की, आपल्या देशातल्या अत्युच्च संस्थेमध्ये आपण इंजिनिअर व्हावं आणि त्याही पुढं परदेशात जाऊन अधिक उच्च शिक्षण घ्यावं. घरी आईवडिलांची परिस्थिती यथातथा

असल्यामुळं, आत्ताचं शिक्षणच त्यांनी केवळ त्याची गुणवत्ता बघून त्याला दिलं होतं. पुढं त्यानं शिकावं,असं त्यांनाही वाटत होतं. पण तो सगळा खर्च त्यांना झेपण्यासारखा नव्हता.

आता मात्र त्याचा मार्ग त्याला काढावा लागणार होता. आजपर्यंत, तो खेड्याच्या वर्तुळाच्या बाहेर कधी पडला नव्हता. पण, आता त्याला जवळपासच्या महानगरात - शहरात जाण्याशिवाय मार्ग नव्हता. जाण्यायेण्याच्या खर्चासाठी आणि पुस्तकांसाठी अशी मदत घेऊन त्यानं शहर गाठलं. त्या प्रचंड गजबजलेल्या स्टँडवर उतरल्यावर तो जरा चक्रावून गेला. उत्तम दर्जाच्या संस्थेत शिकायचं, तर त्यासाठीच्या अभ्यासक्रमांची पुस्तकं जिथं मिळतात, त्या दुकानाचं नाव फक्त त्याच्याजवळ होतं. तो कागद घेऊन त्यानं शोधाशोध सुरू केली.

अखेर, त्याला ते दुकान सापडलं. तिथं त्यानं, ही देशाच्या पातळीवरची संस्था कुठं असते, याची चौकशी केली. दुकानदारांनी त्याचा पत्ता सांगितला. अभ्यासक्रमाची पुस्तकं घेण्यापूर्वी, आपण निदान संस्थेत जाऊन चौकशी तरी करून यावी, म्हणून त्यानं ती संस्था गाठली. तिथं लावलेल्या वेगवेगळ्या फलकांवरून त्याला कळलं की, या संस्थेत तसा थेट प्रवेश मिळत नाही. त्यासाठी एक प्रवेशपरीक्षा द्यावी लागते. त्यात निवड झाली तरच हा प्रवेश मिळू शकतो. हे त्याला पटलं.

पुन्हा तो त्या पुस्तकांच्या मोठ्या दुकानात परतला. त्यानं या माहितीची खात्री करून घेतली. त्यावर तिथले अनुभवी गृहस्थ म्हणाले, 'तुम्हाला आत्ता अभ्यासक्रमांच्या पुस्तकांची काहीच जरूर नाही. ही परीक्षा तुम्हाला द्यायची असेल तर, तिची तयारी करून घेणारी वेगळी पुस्तकं आहेत. ती सर्व तुम्ही घ्या.' त्याला तो सल्ला

पटला. तशी ती पुस्तकं त्याच्या अपेक्षेपेक्षा महागडी होती. मूळ अभ्यासक्रमाच्या अंदाजानं त्यानं आणलेल्या पैशापेक्षा याच्या किमती जास्त होत्या. तरी, प्रवेशपरीक्षेला पर्याय नसल्यामुळं त्यानं ती खरेदी केली. त्याचे त्यानं दिलेले पैसे कॅश काऊंटरमध्ये टाकल्यावर दुकानदार म्हणाले,'या पुस्तकांची तर तुम्हाला गरज आहेच. पण ही प्रवेश परीक्षा मात्र फारच कठीण असते. त्यात तुम्हाला हमखास यशस्वी व्हायचं असेल, तर त्याची तयारी करून घेणारा क्लास तुम्ही लावा. तो क्लास करणारे कितीतरी विद्यार्थी ही प्रवेश परीक्षा पास होतात.'

त्या तरुणाला ही माहिती नवीनच होती. म्हणून त्यानं विचारलं,'हा क्लास कुठं आहे?'

'तो पुढल्या चौकात आहे.'

त्या चौकात जाण्यापूर्वी वाटेत एका लांबलचक रांगेत उभे असलेले बरेच तरुण त्याला दिसले. कुठलातरी देवदर्शनाचा महत्त्वाचा दिवस असावा, असं त्याला वाटलं. म्हणून त्या रांगेतल्या एका तरुणाला त्यानं विचारलं,'ही कसली बारी आहे?'

तो म्हणाला,'ही बारी नाही राव, क्यू आहे क्यू. तो असा अर्धा मैल आहे. इंजिनिअरिंगच्या प्रवेश परीक्षेत हमखास यश मिळवून देणाऱ्या क्लासजवळ तो जातो!'

त्यावर तो म्हणाला,'मग पुढं कशाला जाऊ, मला त्याच क्लासमध्ये जायचं आहे!'

यावर बारीतल्या त्या तरुणानं सांगितलं,'अहो राव, तुम्ही यातून असे जाऊ शकणार नाही. त्यासाठी, आधी तुम्ही यापुढच्या चौकात जा आणि चौकशी करा.'

तो तसाच पुढच्या चौकात गेला. तिथं पुन्हा आधीपासूनच

अशीच एक बारी होती. त्याला वाटलं,आपण यात उभं राहावं. तरी आधीचा अनुभव पाहता त्यानं चौकशी केली. तेव्हा त्याला त्यातल्या तरुणानं सांगितलं,'प्रवेश परीक्षेत हमखास पास होण्यासाठी जो क्लास आहे, त्या क्लासलासुद्धा असा प्रवेश मिळत नाही. ती तयारी करून घेण्यासाठी त्याआधीचा क्लास लावावा लागतो. त्या क्लासमध्ये प्रवेश घेण्यासाठीसुद्धा खूप गर्दी असते. या क्लासमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी हा क्यू आहे.'

तो तरुण म्हणाला,'मग मला यातच आधी प्रवेश घ्यावा लागेल. म्हणजे मला प्रवेश परीक्षेत हमखास यशस्वी होणाऱ्या क्लासला प्रवेश मिळेल. ठीक आहे.'

'हा पूर्वतयारी करून घेणारा क्लास असला, तरी तुम्हाला इथं उभं राहून त्यात प्रवेश मिळणार नाही. त्यासाठी एक प्रमाणपत्र लागतं. तुम्ही असेच पुढच्या चौकात जा. '

तो चिकाटीनं पुढच्या चौकात गेला. तिथं एक संस्था होती. तिच्याही बाहेर बरेच तरुण उभे होते. त्यानं, ही कसली संस्था आहे, अशी चौकशी केली. तिथल्या एका प्रौढ गृहस्थांनी त्याला सांगितलं,'हे बघ, तुला देशातल्या उत्तम संस्थेत प्रवेश मिळवायचा आहे ना. तो मिळावा म्हणून, त्याची हमखास यशस्वी तयारी करून घेण्यासाठी आधी त्या नामांकित क्लासमध्ये प्रवेश मिळवावा लागतो. तो प्रवेश मिळवण्यासाठी, त्याची तयारी करून घेणारा दुसरा क्लास आहे. त्यात प्रवेश घेण्यासाठीसुद्धा किती गर्दी आहे, हे तू पाहिलंस का? या साऱ्यांत यशस्वीपणे प्रवेशपरीक्षेपर्यंत जायचं असलं, तर त्या दुसऱ्या क्लासमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी तयारी करून घेणारी ही संस्था आहे. दुसऱ्या क्लासमध्ये प्रवेश घेण्याची पात्रता तुमच्या ठिकाणी आहे, असं इथलं प्रमाणपत्र दाखवल्याशिवाय त्या दुसऱ्या

क्लासमध्ये प्रवेश मिळत नाही.'

त्यानं विचारलं,'हे प्रमाणपत्र मी इथं मिळवलं तर काय होईल?' त्यावर ते म्हणाले,'तुला त्या दुसऱ्या क्लासमध्ये हमखास प्रवेश मिळेल.'

तो म्हणाला,'मग हमखास प्रवेश मिळाल्यावर मी माझी इंजिनिअरिंगची प्रवेश परीक्षा देऊ शकतो का?'

ते म्हणाले,'तसं कसं होईल? ते इतकं सोपं थोडंच आहे? त्यात हमखास पास होण्यासाठी असलेल्या क्लासमध्ये तुला या दुसऱ्या क्लासचं प्रमाणपत्र मिळवावं लागेल. ते मिळाल्यावर तू त्या हमखास पास होण्यासाठी असलेल्या क्लासमध्ये प्रवेश मिळवू शकशील. त्यामध्ये अभ्यास केलेले तर मूळ इंजिनिअरिंगच्या प्रवेश परीक्षेत हमखास पास होतात!'

त्यानं तरुण थोडा चक्रावून गेला होता. तरी त्यानं चौकशी केली,'या संस्थेपासून दुसऱ्या आणि पहिल्या क्लासपर्यंत सर्वांना बुद्धिमत्तेवर प्रवेश मिळतो का, की या प्रत्येक ठिकाणी त्यासाठी फी असते?'

ते गृहस्थ म्हणाले,'अरे तुला व्यवहारज्ञान कमी दिसतंय. या तीनही ठिकाणी अशी तयारी कुणी फुकट थोडीच करून घेईल? हे काय धर्मादाय काम आहे का?'

तो खेड्यातला तरुण पुढचं ऐकायला थांबला नाही. तो खेड्यातला असला, तरी बुद्धिमानही होता, व्यवहारचतुरही होता. हा विषय त्याला नवीन असला, तरी भाजीपाला, किराणा, शेतीमाल - सगळ्यांतली बाजाराची गणितं त्याला अवगत होती, नव्हे तो ती तोंडी सोडवीत असे. त्यानं रस्त्याकडेच्या बाकड्यावर बसून पाच मिनिटं विचार केला आणि स्टँडवर जाऊन घर गाठलं.

त्याच्या हाती प्रवेशपरीक्षेची मूळ पुस्तकं होतीच. त्यानं कसून अभ्यास केला. परीक्षा दिली. तीन महिन्यांनी परीक्षेचे निकाल लागले. सर्वश्रेष्ठ संस्थेच्या प्रवेशपरीक्षेत तो पहिला आला होता. त्याच्या गावी संस्थेचं निकाल आणि प्रवेशपद्धतीबद्दल पत्रही आलं होतं. सगळ्या गावानं त्याचं अभिनंदन केलं.

प्रवेश घेण्याची मुदत लगेचच असल्यामुळं तो पुन्हा शहरात असलेल्या त्या देशातल्या सर्वोच्च संस्थेत दाखल झाला. तिथं, त्याला प्रवेशपरीक्षेत पहिला आलेला असल्यामुळं, कुठल्याही फीशिवाय प्रवेश मिळाला. सरकारी नियमानुसार पुस्तकं, शिक्षणासाठी त्याला शिष्यवृत्तीही देण्यात आली.

प्रवेश घेण्याच्या टप्प्यांतली कामं सुरू असताना मध्ये चहाची सुट्टी झाली. म्हणून तो ऑफिसमधल्या कोचावर बसला होता. समोर टीपॉयवर पडलेल्या वर्तमानपत्रात त्याला त्याचाच फोटा दिसला. आश्चर्य वाटून त्यानं पाहिलं, तर तीनही संस्थात शिकून यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांच्या तीनही जाहिरातीत त्याचं नाव आणि फोटो झळकत होता. तो ते ओळखू शकला!

त्याला वाटलं, उच्च शिक्षणाला प्रवेश घेण्यापूर्वीच आपण बरंच काही शिकलो आहोत! खऱ्या कष्टाचा, सचोटीचा आणि सर्वांनी चालावा - असा आदर्श मार्ग चालण्याचं उच्चच काय, उच्चतर शिक्षण - हिताचं आणि शाश्वत आहे. ते आपल्याला स्वावलंबनानं आजन्म घ्यावं लागणार आहे आणि इतरांनाही ते आपण निर्धारानं, विनामूल्य द्यायचं आहे!

***

५. आजचं 'वीर'चक्र..?

मम्माच्या हातात पौष्टिक पदार्थांच्या मेन्यूचं कार्ड होतं. तेज त्यांचा एकुलता एक मुलगा होता. तो शाळेतून घरी यायला फक्त पंचवीस मिनिटं राहिली होती. आल्याआल्या त्याला द्यायचा नाश्ता हा ताजा आणि गरमही असणं आवश्यक होतं. त्यावर तिचं आणि पप्पांचं एकमत होतं. त्याच्या अभ्यासाच्या आणि करिअरच्या बाबतीत ते जितके काटेकोर होते, तितकेच त्याच्या खाण्यापिण्याबद्दल!

ते वेळच्यावेळी गेलंच पाहिजे. ते पौष्टिक असलं पाहिजे. त्यात रोज बदल असला पाहिजे. त्यात सारी जीवनसत्त्वं त्याला मिळालीच पाहिजेत, यावर त्यांचा कटाक्ष होता. अर्थात, पप्पांच्या नोकरीमुळं यातलं बरंच सगळं तिलाच वेळच्यावेळी बघावं लागत असे. त्यासाठी रोजच्या रोज ताजी मंडई, हवामानाप्रमाणं मिळणाऱ्या भाज्या-फळफळावळ मम्मी कटाक्षानं आणत असे.

पहिल्यापहिल्यांदा त्या मुलाला हे सगळं करण्याचा फार कंटाळा येई. इतर मित्रांकडं बघितलं, की त्यांना असलेली मोकळीक बघून त्याची चिडचिड होई. एकदा तो मम्मीला त्यावरून बोलला. मम्मी करारी होती. तिनं त्याचं म्हणणं आवश्यक तेवढं ऐकून घेतलं आणि त्याला एकाच वाक्यात सांगितलं,'आपल्याला बाकीच्या मुलांसारखं व्हायचं नाहीये.तुला खूप मोठं व्हायचं आहे, इतर सगळ्यांपेक्षा. ती काय पोटापुरतं कमावतील आणि इथंच गल्लीत राहतील. तुला मोठं होऊन आकाशात भरारी घ्यायची आहे..'

ती पुढं म्हणाली,'ती जे पंचवीस वर्षांत शिकतील, ते तू वीस वर्षांत शिकू शकतोस. ती जे पन्नास वर्षांत कमावतील, ते तू पंचवीस

वर्षांत कमावू शकतोस. पप्पा किंवा मी पैशाला काही कमी करीत नाही. मी स्वतः पहाटे पाचपासून रात्री नऊपर्यंत तुझं सगळं वेळापत्रक सांभाळते आहे. ती मुलं किती चुकार आहेत. तुझा सकाळी सहा ते सहा वीसचा व्यायाम आणि दुधाचा ग्लास कधी चुकला आहे का बघ!'

'मुलांनी खेळलंच पाहिजे. संध्याकाळचा सहाचा नाश्ता झाला की गच्चीत सहा ते साडेसहा इतका वक्तशीरपणे कुणाचा खेळ होतो का पहा. त्या मुलांना ध्येय नाही, शिस्त नाही. संध्याकाळी सहा ते सात, खेळण्यासाठी मुलांना एकत्र करण्यातच त्यांचा वेळ जातो. उलट तू साडेसहाला एकट्यानं खेळून होमवर्कसाठी बसलेला असतोस. असल्या मुलांच्या संगतीत तुझा किती वेळ वाया गेला असता बघ..!'

रोज असे 'योग्य' संस्कार मिळून तेज खूपच तयार झाला होता. बस्! आयुष्यात लवकरात लवकर, मोठ्यात मोठ्या पगाराची पोस्ट मिळवण्याचं ध्येय,इतरांनी वेळी हेवा करावा अशी श्रीमंती, हे आणि असं बरंच काही..! त्याच्यासाठी काहीही करायला तयार असलेल्या पप्पा-मम्मींचं ध्येय साकार करणं, यानं तो पुरता पछाडून गेला. रात्री झोपेतसुद्धा आपण आपल्या पप्पा मम्मींना घेऊन खूप मोठ्या चार्टर्ड विमानातून आजूबाजूला रिकाम्या असलेल्या खास खुर्च्यांकडं नजर टाकीत, आपले आपणच स्पेशल विमान प्रवासाचा अनुभव घेत आहोत, असं त्याला स्वप्नात दिसत असे.

मम्मी एकदा भूगोलाचा अभ्यास घेताना म्हणाली होती, 'तेज, आपल्याकडं दिवस बारा तासांचा असतो व रात्र बारा तासांची असते. त्यामुळं दिवसभर उद्योगाची कामं करता येतात. तसंच व्यायाम, नियमित खाणंपिणं, जादा अभ्यास, विश्रांती यांनाही वेळ

मिळतो. यांमुळं आरोग्य उत्तम राहातं. दोन्ही ध्रुवीय वातावरणांत कुठं चोवीस तास दिवस तर कुठं चोवीस तास रात्रही असते. तसं आपल्याकडं नाही, हे आपलं भाग्यच आहे..'

'..पण, तेज एक लक्षात ठेव, की आपल्याला करिअरसाठी कुठल्याही वातावरणात काम करण्याची सवय पाहिजे. आपल्याला खूप वरच्या पोस्टला जायचं असलं,पैसाही खूप मिळवायचा असला तर मग त्यासाठी, असं ठरीव काम करून चालत नाही. कितीही, केव्हाही काम करायची तयारी लागते. करिअर करणाऱ्याला अशी कामं करावीच लागतात..!'

तेव्हापासून मात्र तेजची सारी मानसिकताच बदलली. पप्पा-मम्मींनी त्यांचं सारं काही आपल्या करिअरसाठी पणाला लावलं आहे, त्यामुळं आता त्याचं चीज करणं,एवढं त्याच्यासमोर एकच ध्येय ठरलं. मम्मीच्या अपेक्षेप्रमाणं शैक्षणिक गुणवत्ता अव्वल दर्जाची राखल्यामुळं, कॅम्पसमधूनच तो थेट एका एमएनसीमध्ये लागला.

काही दिवसांनी तेजच्या बॉसनी त्याला सांगितलं की, 'तुमचा ट्रेनिंग पीरियड संपला. तुमच्या कामावर परदेशातल्या मूळ कंपनी व्यवस्थापनाचंही लक्ष आहे. त्यांनी तुम्हाला आउटस्टँडिंग शेरा दिला आहे. त्यामुळं, कंपनी आता तुम्हाला नोकरीत कायम करीत आहे.' असं म्हणून, त्यांनी त्याला कन्फर्मेशनचं ऑफर लेटर दिलं. त्यात त्याला देऊ केलेलं पॅकेज त्याच्या अपेक्षेपेक्षा जवळजवळ दुप्पट दिलेलं होतं. तो थक्क झाला.

त्यांनी पुढं म्हटलं, 'मात्र, तुम्हाला आता रात्री उशीरा थांबावं लागेल.' त्यानं विचारलं,'म्हणजे इथं मला शिफ्ट ड्यूटी असेल का?'

'शिफ्ट नाही. पण ड्यूटी मात्र भरपूर असेल. कामावरून जायला साधारणतः रात्री अकरा ते बारा वाजतात. आम्हीही

त्याच्यानंतरच जातो. अर्थात, हे केलं तर पुढं आणखी प्रगतीच्या संधीही आहेत.'

तेज महत्त्वाकांक्षी, कामसू असल्यानं त्यानं ते मान्य केलं. फक्त विचारलं की, 'इथं कामच एवढं असतं म्हणून थांबावं लागतं की, मी ते आधी संपवलं तर घरी जाऊ शकतो?'

बॉस म्हणाले, 'नाही. कामाचं एवढं प्रेशर नाही. पण आपली कंपनी एमएनसी आहे. परकीय आहे. तिचं हेडक्वार्टर परदेशी आहे. तिथं ते लोक, तिथल्या प्रमाणवेळेप्रमाणं सकाळी आठ ते दुपारी चार काम करतात. पण त्यावेळी आपल्याकडं रात्रीचे अकरा ते पहाटेचे सुमारे पाच वाजतात. त्यामुळं ते कामावर हजर झाले की, आपल्या कामाचा आढावा घेतात. त्यावेळी इथं अर्थातच रात्रीचे अकरा ते बारा वाजतात. तोपर्यंत कॉन्फरन्सिंगसाठी आपल्याला थांबावं लागतं.'

तेज म्हणाला, 'तसं असेल तर मग आपण संध्याकाळी चार ते रात्री बारा, असं काम करू शकतो का?'

ते म्हणाले,'तशी आपल्याला परवानगी नाही. आपण आपल्या वेळेप्रमाणं सकाळी आठ वाजताच कामाला यायचं आहे!'

तेजला क्षणभर जरा चीड आली. त्याला वाटलं, म्हणजे हे दिवसा काम करणार. तेही सहासात तास आणि आपण मात्र दिवसरात्र काम करायचं तेही चौदा-चौदा तास! आपण उच्च पदावर काम करतो, म्हणून खरे बॉस की गुलाम? शिवाय इतकं दमून गेल्यावर आपण घरी, लॉजवर पाठ टेकायला जावं तसे जाणार. घरी काहीही करू शकणार नाही. कशातही भाग घेऊ शकणार नाही. तेवढ्यात मम्मानं भूगोल शिकवताना आपण ध्रुवीय वातावरणापेक्षा

आपल्या देशात राहातो, ते भाग्य आहे, हे सांगताना करिअरसाठी कितीही काम करायला लागेल, हे म्हटल्याचंही त्याच्या मनात चमकून गेलं.

तो विचारात पडला. पण एवढा मोठा पगार त्याला दिवसाचं काम करून कुठंही मिळणार नव्हता. एखाद्या लढाईवर जाणारा, जसा बायको, मुलं, घरदार, नातेवाईक, समाज, भावभावना, इतकंच काय स्वतःच्या जिवाचीही पर्वा करीत नाही, असं असतंच ना ! त्यामुळं इथंही असा विचार करून चालणार नाही. म्हणून त्यानं या ऑफरला होकार दिला.

घरी आल्यावर त्यानं याची सर्वांना कल्पना दिली. त्याला क्षणभर वाटलं होतं की, असल्या अमानवीय कामाला कदाचित विरोध होईल. आपल्याला थोड्या कमी पगारावरच्या दिवसाच्या नोकरीवर जाण्यासाठी आग्रह धरला जाईल. म्हणजे आपलं स्वास्थ्य राहील. आपण घरच्यांनाही वेळ देऊ शकू. पण तिथं उलटंच झालं. पत्नी, नातेवाईक - सारेच त्याच्या या नव्या पोस्टवर, कामावर व पगारावर एकदम खूष होते. त्याच्या महत्त्वाकांक्षेचंही सर्वांनी कौतुक केलं. तेजच्या फादर-इन-लॉनाही तेजचा फार अभिमान वाटला. त्यांना स्वतःला मिलिटरीत जायचं होतं. ते जमलं नाही. पण त्यांनी महत्त्वाकांक्षेनं पैसा आणि नाव कमावलं. त्यांना आपल्या जावयाला-तेजला जणू बॉर्डर पोस्टिंग मिळाल्यासारखं वाटलं.

तेजनं नव्या असाइनमेंटवर वर्षभर काम केलं. त्यात रोजचं जागरण, कामाचे अतिरिक्त ताणतणाव त्यानं मुकाट्यानं सहन केले. वर्षभर काम केल्यावर, भरपूर पगाराबरोबर इतर पर्क्स मिळाले. तसंच त्याला उच्च रक्तदाब व मधुमेह हेही पर्क्स म्हणून मिळाले. त्याची प्रकृती मधूनमधून बिघडू लागली.

काही काळानं एक आठवडा असा आला की, त्यात कामाचा ताण रात्रीचे बारा वाजले तरी संपेना. कामाच्या अपेक्षा आणि प्रेशर हळूहळू अती झाले. त्या आठवड्यात एके दिवशी त्याच्या रक्तदाबानं मर्यादा ओलांडली आणि तो कामाच्या जागीच कोसळला. कंपनीतल्या डॉक्टरांच्या मतानुसार सारं संपलं होतं. दवाखान्यात नेण्यात अर्थ उरला नव्हता. पण त्याच्या क्लेमचं कुठलं नुकसान होऊ नये, म्हणून त्याला दवाखान्यात नेऊन, तिथून त्याचा मृत्यू अधिकृत करण्यात आला. त्याला कंपनीच्या गाडीनं घरी पोचवण्यात येणार होतं. त्यासाठी त्याचे बॉस केबिन बंद करून बाहेर पडणार, इतक्यात त्यांच्या संगणकावर, तेजचा पगार त्या महिन्यापासून एकदम दुप्पट केल्याची मेल आली होती. त्यांनी झटपट त्या मेलची कॉपी बरोबर घेतली. एका आकर्षक पाकिटात ती बंद केली. त्याचबरोबर कंपनीच्यावतीनं एक सांत्वनपर पत्रही त्यांनी बरोबर घेतलं. आपल्या इतर सहकाऱ्यांसह ते तेजचा मृतदेह घेऊन त्याच्या घरी पोचले. घरी सर्वांना आधी कल्पना दिलीच होती.

सर्वजण घरी पोचले. त्यावेळी त्याचे वडील म्हणाले, 'आज केवळ बत्तिसाव्या वर्षी हे घडलं असलं तरी, ते स्वीकारावंच लागेल. पण त्याच्या कामातल्या उत्कृष्टतेमुळं त्याचा पगार दुप्पट झाल्याचं पत्र, हे त्याच्या आयुष्यातलं उत्तुंग शिखरच त्यानं सर केलं !'

त्याचे सासरे म्हणाले, 'माझा लाडका जावई लढता लढता गेला. हे पत्र म्हणजे मी त्याचं मरणोत्तर 'वीर'चक्रच मानतो! निःस्वार्थी कामांसाठी, देशासाठी कंपनीमार्फत केलेल्या लढायांचं मूल्य, सामान्य माणसांना कळणं अवघड आहे. जिवावर उदार होऊन, माणुसकीला गौरवास्पद असलेली श्रेष्ठ मूल्यं जगण्यासाठी, त्यानं आत्मार्पण केलं! '

तेजचे आईवडील आणि सासरेही तसे प्रसिद्ध असल्यामुळं बाहेर खूप लोक जमा झाले होते. तेजच्या मोजक्या, महत्त्वाकांक्षी मित्रमंडळींत काही पत्रकार होते. त्यांनी या उद्‌गारांची नोंद घेतली. त्यांच्यात आपापसात काही चर्चा सुरू झाली.

इतक्यात, कंपनीच्या बॉसला कंपनीचे जवळच्या देशातले एक वरिष्ठ अधिकारी कंपनीचे प्रतिनिधी म्हणून, येत असल्याचा कॉल आला आणि त्यांच्यासाठी थांबावं, अशाही सूचना मिळाल्या. तशी कल्पना दिल्यावर तेजचे पप्पा तेजच्या सासऱ्यांना म्हणाले,'अत्युत्कृष्ट कामाची नेहमी कदर होत असतेच. परदेशी लोक तर यात तत्पर असतात.'

तेजची पत्नी प्रसंगाला अनुरूप अशा पद्धतीनं घरातल्या कोपऱ्यात बसली होती. तीही तितकीच महत्त्वाकांक्षी असल्यामुळं तिच्या मनात काही वेगळेच विचार सुरू होते. तिच्यादृष्टीनं तेज आव्हानाला तोंड देण्यात शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या थोडा कमकुवतच ठरला होता, म्हणून हे घडलं. त्यामुळं, त्यात फार विशेष नव्हतं. ती मनातल्या मनात, यापुढच्या आपल्या एकत्रित उत्पन्नाचा अंदाज बांधत होती. ती मनात म्हणाली,'एक बरं झालं. आमच्या मागं मुलाबाळाचा खर्च आणि व्याप नाही! आता मला माझ्या मनाप्रमाणं थोड्यादिवसानं तरी माझ्या आवडत्या महत्त्वाकांक्षी मुलाशी लग्न तरी करता येईल..!'

तिकडं पत्रकारांच्या बरोबर त्यांच्या ओळखीनं काही इतर पत्रकारही जमले होते. त्यांच्या समूहात वेगवेगळ्या चर्चा सुरू होत्या. एक जण म्हणाले,'ही मोठी माणसं आहेत, आपण काय बोलणार? पण हा स्वार्थामुळं करून घेतलेला आत्मघात आहे.'

'हे त्याला, जणू देशासाठी झालेला हुतात्मा ठरवताहेत.

खऱ्या लढायांत सांगण्यासारखं आणि ऐकण्यासारखं असतं. कारण ते प्रेरणादायी असतं. त्या लढाया इतरांसाठी असतात.'

तेजच्या पत्रकार मित्रांना थोडी अस्वस्थता आली. पण त्यांनी त्या इतर पत्रकारांना शांत राहण्याची खूण केली. तेवढ्यात परदेशातून आलेले कंपनीचे वरिष्ठ अधिकारी आलिशान गाडीतून खाली उतरले. त्यांच्या स्वागतासाठी कंपनीचे बॉस पुढं झाले. तेजसाठी आणलेलं पुष्पचक्र तेजला वाहताना, परदेशी कंपनीचे ते प्रतिनिधी म्हणाले,'एवढ्या पदावर एवढ्या लवकर पोचणारी आमच्या कंपनीतली ही पहिलीच महत्त्वाकांक्षी व्यक्ती आहे. आमच्या कंपनीच्या परदेशातल्या कार्पोरेट ऑफिसमध्ये तेजचा फोटो लावण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यापासून इतरांनी प्रेरणा घ्यावी!'

तेजचे सासरे पुन्हा म्हणाले,'मी आत्ताच म्हणालो तसं, या पुष्पचक्राच्या रूपानं तेजला परदेशानंही वीरचक्रच अर्पण करून, त्याच्या लढाईचा योग्य गौरव केला आहे.'

पत्रकार आपापल्या पद्धतीनं चित्रीकरण करीत होते. त्यातल्या काहींनी अशा वेगवेगळ्या उद्‌गारांची नोंद घेतली. या साऱ्या व्यक्ती प्रतिष्ठित असल्यामुळं, उद्याच्या पेपरसाठी त्यांना हा इव्हेंट कव्हर करण्याच्या सूचना होत्या.

नंतर बरोबरच्या एका पत्रकारानं तेजचे वडील आणि सासऱ्यांना विचारलं,'तेजची ही लढाई कशाची होती व कुणाविरुद्ध होती, हे आपण थोडं स्पष्ट करू शकाल काय?'

त्यावर मात्र उभयता व्याही गप्प राहिले.

पत्रकार तसा चाणाक्ष असल्यामुळं, आपण विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर थोडं अडचणीचं आहे, हे त्याच्या लक्षात आलं. त्यानं ती

मुलाखत तिथंच थांबवली.

दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रात सारा इव्हेंट, सारी कारकीर्द, गुणगौरव, फोटो - वेगवेगळ्या प्रकारे कव्हर करण्यात आलं होतं. फक्त या पत्रकाराचा प्रश्न आणि त्यावरचा मूक प्रतिसाद हे मात्र दुसऱ्या दिवशीच्या प्रसिद्धिमाध्यमांत या वृत्तांतातून गाळण्यात आलं होतं. तसंच पुढंही ते कधी प्रसिद्ध झालं नाही !

•

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी तेजच्या बंगल्याच्या बाहेरची वर्दळ कमी झाली. बंगल्याच्या रस्त्याच्या कडेच्या झाडाचा पाला खाताना शेळीनं आपल्या लेकराला थांबवलं. त्याला घेऊन ती घराकडं परतू लागली.

ते अजाण लेकरू म्हणालं, 'मला पाला फार आवडला. तू का थांबवलंस ?'

शेळी म्हणाली,'बाळा, आपल्या भुकेपेक्षा आपण जास्त खात नाही ! तसं केलं तर पोट बिघडतं.'

बाळ म्हणालं, 'ठीक आहे.'

त्यानं पुढं विचारलं,'मग तू तोंडात धरून हा पाला घेऊन का चालली आहेस ?'

शेळी म्हणाली,'अरे, घरी तुझं धाकटं भावंडं नाही का? ते फार लहान आहे. त्याला तुझ्यासारखं फिरून पाला खाता येत नाही. त्यामुळं, ते भुकावून आता घरी वाट बघत असेल. असं साठवून न्यायचं असेल, तर त्याच्यासाठी आणि तेही आजच्यापुरतं..!'

***

६. आवाज : दुर्लभ आणि सुलभही..!

रावसाहेबांच्या बंगल्यावर लाइटिंगचा नुसता झगमगाट होता. गल्लीतल्या रस्त्यावरच्या घरांना ते नवीन नव्हतं. परिसरातल्या कुठल्याही घरातून ते उठून दिसत असे. मोठ्या चौकातून गाड्या आत वळल्या की, चालवणाऱ्या ड्रायव्हर लोकांचे डोळेसुद्धा दिपून जात. त्या बंगल्यावरती रात्रीचे ते आकर्षक लाइटिंग लागलं, की कुणाला काही सांगायची गरजच नसे. लोक ओळखत, उद्या रावसाहेबांच्या घरी महापूजा.

सत्यनारायणाची पूजा हा काही कुणाला नवीन विषय नव्हता. अनेकांच्या घरी ते एक वार्षिक होतंही. पण रावसाहेबांच्या घरच्या महापूजेचा थाट काही और असे. त्यांचे आमंत्रित म्हणून, पाच-सातशे माणसं ही तर नेहमीचीच. पण त्यादिवशी आवर्जून आमंत्रणाची गरज नसे. तशी शे-दोनशे माणसं नुसतीच आलेली. आत हिरवळीवर जागोजागी टेबल-खुर्च्या मांडलेल्या असत. रावसाहेब दारात सर्वांच्या स्वागताला उभे असत. त्यातली निम्मी मंडळीसुद्धा आत पूजेला जाऊन देवासमोर पैसे ठेवून येणारी नसत. बाहेरच त्यांच्याशी आणि जमलेल्या इतरांशी गप्पाटप्पा आणि महत्त्वाचं म्हणजे, मनुष्य पुन्हा उद्यापर्यंत जेवण मागणार नाही, अशी स्वादिष्ट पदार्थांची प्रसादाची डिश. त्यातच तासभर जाई आणि लोक रावसाहेबांना नावाजत. पूजेहून घरी परतत.

रावसाहेब दमले तरी, पहाटे पाचचं त्यांचं फिरणं चुकत नसे. त्यानुसार, ते दुसरे दिवशी नेहमीसारखे तोंड धुऊन फिरायला बाहेर पडणार, एवढ्यात त्यांचं बंगल्याच्या मागच्या दरवाजाकडे लक्ष गेलं.

तो सताड उघडा होता. त्यांना वाटलं, आपल्याला अंधारात काही भास झाला असेल. नाईट लॅम्पमध्ये नीट दिसलं नसेल, म्हणून त्यांनी परत परत पाहिलं. तर दरवाजा खरंच उघडा होता. त्यांना एकदम जोरात ओरडावसं वाटलं. ते ओरडले. पण त्यांना स्वतः एवढं मोठ्यानं ओरडूनही काहीच आवाज आला नाही. पहाटेची वेळ होती, त्यामुळं इतर सगळीकडं शांतता होती.इतक्यात,खोलीतून त्यांची पत्नी घाबरीघुबरी होऊन बाहेर आली.

तिनं विचारलं,'काय झालं?'

ते घाबरलेले असूनही त्यांनी आश्चर्यानं विचारलं,'तू कशी काय आलीस?'

ती म्हणाली,'हे काय? तुम्ही केवढ्यांदा ओरडलात, म्हणून मी बघायला आले!'

ते म्हणाले,'बरोबर आहे. मी ओरडणार होतो. पण मी ओरडूच शकलो नाही.'

'असं कसं होईल? मी हाक स्पष्ट ऐकली.'

दोघंही गोंधळले होते,घाबरले होते. रावसाहेबांनी बंगल्याच्या मागच्या दरवाजाकडं बोट केलं. तो तसाच सताड उघडा होता. पत्नीही घाबरली.

ते म्हणाले,'मी रात्री नेहमीप्रमाणं तो लावला होता. तू कशासाठी उघडला होतास का? तसाच राहिला का?'

तशातही रागावून ती म्हणाली,'मी कशाला उघडीन? एवढा उशीर झाला होता, दमणूक झाली होती, मागं जायला मला सवडसुद्धा झाली नाही.'

तेवढ्यात, रावसाहेबांच्या कानावर आलं,'तो दरवाजा मी उघडला.'

पत्नी शेजारीच असल्यामुळं रावसाहेब म्हणाले,'तू नक्की काय म्हणतेस?'

'ते सांगितलं की मी तुम्हाला..मागं जायला सवडसुद्धा नाही झाली मला.' तिनं पुन्हा जोरानं म्हटलं.

'आत्ता तर तू म्हणालीस,तो दरवाजा मी उघडला.' रावसाहेबही तितक्याच जोरात म्हणाले,'मी आत्ता ऐकलं की!'

आता मात्र तिनं त्यांच्याकडं जरा साशंक नजरेनं बघितलं. 'अहो मी असं उलटसुलट कसं म्हणेन? तुमचा काहीतरी गोंधळ होतोय.'

रावसाहेब म्हणाले,'थांब. आधी ते खरं आहे का बघून येऊया.' दोघंही तसे घाबरलेले असल्यामुळं एकमेकांच्या धीरावर मागंपर्यंत गेले. जवळ येताच त्यांच्या लक्षात आलं, की दरवाजा उघडा होता. दोघांनी जरा पुढं होऊन बाहेरही कुणी आहे का डोकावून पाहिलं. तोपर्यंत बाहेर उजाडलं होतं. त्यांना काहीच दिसलं नाही. ते दोघं मागं परतले. त्याक्षणी, दोघांच्याही लक्षात आलं, की मागच्या दरवाज्याचा काही आवाज येतो आहे. दोघं थबकले, मागं वळून पाहिलं. रावसाहेब खात्री करायला पुढं गेले. दरवाजा नेहमीसारखा बंद होता. आता मात्र ते घाबरले आणि ओरडले,'आत्ता एवढ्यात तू तो बंद केलास की नाही?..'

पत्नीच्या तोंडातून शब्द फुटत नव्हता. त्यावर रावसाहेब घाबरून पण ओरडत म्हणाले,'असं का करतीयेस तू?'

पत्नी म्हणाली,'अहो मी इथं तुमच्या समोर आहे. मी कुठं काय केलंय, म्हटलंय?'

'आत्ता तर तू म्हणालीस, मी तो दरवाजा लावला.'

रावसाहेबांनी हे जोरात म्हटलं खरं, पण भीतीनं त्यांचा

आवाज खोल गेलेला होता आणि हा काहीतरी विचित्र प्रकार आहे, एकतर ही तरी भूत आहे नाहीतर, मी तरी भूत आहे, असा विचार येऊन त्यांची गाळण उडाली. पत्नीच्या चेहऱ्यावर तेच भाव होते. पुढं काही बोलण्यात, ओरडण्यात दोघांना तथ्य वाटेना. भिंतीच्या आधारानं ते किचनमध्ये आले. डायनिंग टेबलपाशी बसले. दोघं शून्यात बघावं, तसं एकमेकांकडं बघत होते. दोन मिनिटांत कुणी काही सांगावं, तशा त्या उठल्या आणि थंड पाण्याचे दोन ग्लास घेऊन टेबलाशी येऊन बसल्या. रावसाहेबांना पाणी दिलं.

रावसाहेबांनी पत्नीला विचारलं,'तुला आत्ता काही ऐकू आलं? म्हणून तू पाणी आणलंस का?'

'होऽय..!' पत्नी.

'दोघंही गार पाणी पिऊन थंड बसा. तुमचे गुरुजी येतायत बाहेर.'

रावसाहेब म्हणाले,'हे असंच मी ऐकलं. पण त्यांची यायची वेळ व्हायचीये. अजून तासभर तरी आहे.'

दोघंही पाच मिनिटं शांत बसले. तेवढ्यात, खरोखरच दारावरची बेल वाजवताना त्यांना गुरुजी दिसले. रावसाहेबांनी बाहेर जाऊन दार उघडलं. आणि म्हणाले,'आज लवकर येणं केलं. तुम्ही नाही आला असता, तरी मी सगळं आवरून नीट ठेवलं असतं. तुम्ही नऊ-दहा वाजता येता, त्यावेळेला दरवर्षीप्रमाणं तुम्हाला ते दिलं असतं.'

बोलता बोलता त्यांच्या लक्षात आलं की, गुरुजीही थोडे घाबरलेले आहेत. त्यांच्या चेहऱ्यावर नेहमीचा बिनधास्तपणा नाही, आत्मविश्वास नाही, असं वाटत होतं. तरी काही सावरून घेत असल्यासारखं ते म्हणाले,'तसं काही विशेष नाही. अहो, चित्रविचित्र

स्वप्नं पडतात. जरा जाग लवकर आली. इकडं सकाळची थोडी कामंही होती. म्हणून म्हटलं वेगळी खेप नको. आलो झालं..!'

रावसाहेबांनाही मनात वाटलं, काही गडबड आहे. पण चेहऱ्यावर तसं न दाखवता, ते त्यांना घेऊन पूजेच्या ठिकाणी गेले. आता मात्र, चौरंगासमोरचं ताम्हन पाहताना त्यांचा चेहरा पडल्याचं रावसाहेबांच्या लक्षात आलं. त्यांनी ते जाणवून दिलं नाही. गुरुजींनी नेहमीप्रमाणे तिथली आवराआवर केली. पण, नेहमीच्या दक्षिणेव्यतिरिक्त ओसंडून वाहणाऱ्या ताम्हनातल्या नोटा त्यांना गोळा कराव्या लागत. यावेळी त्या नोटा अणि काही नाणी ताम्हनाच्या तळाशीच होती. ते रावसाहेबांच्या लक्षात आलं. ते सावरून घेत म्हणाले,'तसे लोक पूजेला नेहमीपेक्षा जास्त होते. अर्थात, सारे काही इथं तीर्थप्रसादापर्यंत येतच नाहीत.'

ते म्हणाले,'असू दे, असू दे. लोकांचा भावही कमी झालाय. काळाचा महिमा आहे.' तोपर्यंत रावसाहेबांची पत्नी त्या दोघांनाही दुधाचे ग्लास घेऊन तिथं आली.

'उगीच काही सांगू नका! आपली कामं आपण मनापासून करावीत. वर्षात गुंडाळलेल्या सगळ्या पूजांचे पैसे वसूल करणं रावसाहेबांच्या घरीच शक्य आहे, म्हणून, ते तिथून नेले आहेत मी, मागच्या दारानं..!'

तिघांनीही चमकून एकमेकांकडं बघितलं. पत्नी म्हणाली, 'कोणतरी बोलल्यासारखं वाटलं,नाही? तुम्ही काही म्हणालात?' असं त्यांनी रावसाहेबांकडं बघून म्हटलं.

रावसाहेब चपापून म्हणाले,'छे, ग!'

गुरुजींचा चेहरा आधीच पडला होता. त्यामुळं त्यांच्याकडं त्यांना बघता येईना. दुधाचा ग्लास खाली ठेवताठेवता गुरुजी

म्हणाले,'काही का असो रावसाहेब, नारायण आपल्याला सांभाळून घेतो आहे. सत्य मार्गावर आणून ठेवतो आहे, ही कृपाच म्हणायची!'

'सत्य सांभाळून घेतलं जाईलच. पण असत्याला रक्षण मिळणार नाही, रावसाहेब तुमच्याही!'

तिघांनीही पुन्हा चमकून एकमेकांकडं बघितलं. रावसाहेबांच्या लक्षात आलं, आपल्याला पहाटेपासून होताहेत ते भास नाही आहेत. विचार करायला लागेल. पण आत्ताच्या वाक्यानं ते आतून गडबडले. कारण, गुरुजींनाही ते ऐकू गेलेलं असावं. दोघांनीही पुढं काही विषय न वाढवता, नमस्कार करून एकमेकांचा निरोप घेतला.

दारापर्यंत त्यांना पोचवून आल्यावर रावसाहेब त्यांच्या पत्नीला घेऊन त्यांच्या आतल्या खोलीत गेले. तिथल्या कोचावर दोघंही शांतपणे बसले. दोघांनाही बोलायचं होतं. पण काय आणि कसं, याचं धाडस होत नव्हतं.

शेवटी रावसाहेबांनी कोंडी फोडली. ते पत्नीला म्हणाले,'हा काही भ्रम नाही, भुताटकी नाही, पण काहीतरी वेगळं घडतंय, एवढं मात्र खरं.'

पत्नीनं मान हालवली. त्या गरीब घरातल्या होत्या. त्यांना त्यांच्या वडिलांची आठवण झाली. त्यांचीही नोकरी कष्टाची होती. पदरात तीन मुली होत्या. नेहमीचा खर्चवेच होताच. पण व्यवहार सचोटीचा.

काही वेळा त्यांना खर्चाचं ओझं होई. पण, कुणी गरजू कधी विन्मुख गेला नाही. यांची आई अनेकदा म्हणेसुद्धा,'अहो, आपल्यावर एवढ्या जबाबदाऱ्या आधीच आहेत. आईवडील, शिकणारी भावंडं, या तिन्ही मुली, त्यात आणखी हा दानधर्म कशाला गळ्यात ओढवून घेता? असलं तर द्यावं माणसानं. बरं, मिळवायचे

इतर मार्गही तुम्हाला चालत नाहीत.'

असे अनेक संवाद त्यांना आठवले. वडील सचोटी सोडून गेले नाहीत म्हणजे नाहीतच. त्याअर्थानं, त्यांचं तसं वेळेला कधी अडलंही नाही. तेव्हा, एकदम वडील मधूनमधून म्हणत त्या वाक्याची त्यांना आठवण झाली. 'सचोटी भवसागरात आपल्याला तरंगत ठेवणारा मोधळा आहे आणि लोभ धोंडा. गटांगळ्या खायला लागल्या तरी सत्याचा मोधळा वाचवल्याशिवाय राहात नाही आणि लोभाचा धोंडा बुडवल्याशिवाय राहात नाही, हे लक्षात ठेव.' पण इथलं सासरचं गणित जरा वेगळंच होतं. त्यांना पटलं नाही, तरी बोलता येत नसे. पण आज मात्र, काही वेगळा दिवस उगवला होता.

रावसाहेबांच्या डोक्यातून मगाशी ऐकलेली वाक्यं जात नव्हती. त्यातल्या त्यात सात्त्विक असलेले एक पुजारी सुटले नाहीत, तर आपलं नक्की काय होणार आहे, असा विचार त्यांच्या मनात घोटाळत होता.

त्यांच्या मनात आलं, आपणही मिळालेल्या नोकरीचं काम करतो आहे, कष्ट घेतो आहे, सह्या करतो आहे, जबाबदाऱ्या घेतो आहे..! तोवर त्यांना अडवल्यासारखा आवाज ऐकू आला. 'कामाचा पगार कामापेक्षा जास्त मिळतोय ना?' त्यांचे विचार अडवले गेले. पण त्यांच्या मनात आलं, पण मी कुठं काय कुणाकडं मागितलंय? 'पण तुमच्या शिफारशीशिवाय आत काम होत नाही. ही पद्धत कुणी घातली? तुमच्या आधीचे रावसाहेब, तुमचे मित्रच होते ना? त्यांनी नाही असं काही केलं. उलट नाव कमावलं, शिव्याशाप नाहीत ना!'

इतक्यात त्यांच्या टेबलावरचा फोन वाजला. तो त्या आधीच्या रावसाहेबांचाच होता. हा योगायोग की योजना, असा विचार करीत ते फोन ऐकू लागले. 'रावसाहेब, आनंद झालाय म्हणून

तुम्हाला फोन केला. चिरंजिवांचा नंबर लागला बरं का, मेडिकलला.'

रावसाहेबांना जरा वेगळा विषय समोर आल्यामुळं उत्साह आला. त्यांना त्यांच्या मुलाच्या गेल्या वर्षींच्या ॲडमिशनची आठवण झाली. तो खरं दोन-तीन वर्षांनी मोठा, पण मेरिटचं गणित काही केल्या जमलं नाही. आधीच दोन वर्षं गॅपमध्ये गेलेली. रावसाहेबांचा हट्ट कायम होता. कुठं मिळेल तिथं आणि अर्थात, काहीही करून घेतलेली ॲडमिशन आणि रिकामी केलेली पैशाची खोकी त्याच्या डोळ्यांसमोर तरळून गेली. पण तो विषय विसरत ते म्हणाले,'वा, वा! सकाळी खूप छान बातमी सांगितलीत. अभिनंदन तुमचं! काही अडचण नाही ना? असेल तर कळवा.'

तोवर ते थोरले रावसाहेब तितक्याच उत्साहात म्हणाले, 'अहो, तुमच्या नुसत्या शब्दांचासुद्धा आधारच आहे आम्हाला. पण चिरंजीव मेरिटमध्येच आहेत. शिवाय, टॅलेंट स्कॉलरशिपही आहे. देवानं माझी वेळ राखली. पगारालासुद्धा धक्का नाही लागू दिला. तुमच्यासारख्या अनेकांचे आशीर्वाद बघा..! '

रावसाहेबांना पुढचं ऐकूच येत नव्हतं. त्यांना क्षणभर वाटलं, आपल्यासारख्यांचे आशीर्वाद त्याला नसलेलेच बरे. आता हे सुरू झालंय, त्याच्यात कायकाय होतंय कुणास ठाऊक?

'व्हायला हवं आहे, ते झालेलं आहे!' आवाज.

क्षणात, शिफारशींचा आणि डोनेशनचा हिशेब त्यांच्या लक्षात आला. तरी, ड्रॉवरमधली किल्ली घेऊन त्यांनी कपाटाचा लॉकर उघडला. पत्नीला संवादावरून बराचसा अंदाज आला होता. घडतंय ते अनिष्ट नाही, इष्टच आहे, या विचारानं खोलीचा दरवाजा बंद करीत त्या त्यांच्या मागोमाग गेल्या. रावसाहेबांनी थरथरत्या हातांनी

लॉकर उघडला. तो एकदम रिकामा होता. ते स्तंभित झाले. हेसुद्धा गेलं, मागच्या दारानं? असं त्यांच्या मनात आलं. फक्त लॉकरच्या कोपऱ्यात एक छोटं पैशाचं पाकीटआणि कागदाच्या पुरचुंडीत ठेवलेली सोन्याची अंगठी. ती तशीच होती. दोघं एकमेकांकडं पाहात होते.

'एवढं सगळं तर गेलंच. आता, ही बंडलंही दिसेनाशी झाली, असं वाटतंय ना? ती वरकड होती. मागच्या दरवाजानं आली, त्याच दरवाजानं गेली. आता शिका. शांत राहा.' पुन्हा तोच आवाज.

हे समजलं तरी, रावसाहेबांच्या मनात आलं, हे पाकीट आणि ही सोन्याची पुरचुंडी?

'लक्षात आहे ना, ती सासऱ्यांनी दिलेली आहे. मला सत्याला हात लावता येत नाही!!'

हे ऐकताना, वडिलांच्या आठवणीनं पत्नीच्या डोळ्यांत पाणी आलं. रावसाहेबांनी मनाशी काही निर्धार केला.

त्या क्षणी पुन्हा आवाज हजर. 'नक्की ठरलं? आता निश्चिंत राहा आणि चांगल्याचीही खात्री वाटायची असली, तर बंगल्याच्या गेटजवळ उजव्या बाजूला हिरवळीवर पाहून ये, जे तुझं ते तुझंच आहे.'

दोघंही उत्सुकतेनं भराभर बंगल्याचा दरवाजा ओलांडून गेटजवळ गेले. हिरवळीवर कोपऱ्यात, अर्धवट माती लागलेली तीन तोळ्यांचीअस्सल सोन्याची साखळी रात्रीपासून पडून होती. रावसाहेबांचा हात नकळत त्यांच्या गळ्याकडं गेला. त्यांच्या गळ्यातली साखळी नव्हती. कार्यक्रमाच्या वर्दळीच्या नादात, कधीतरी हातवारे करताना, दुवा तुटून तिथं उडालेली ती साखळी त्यांनी पटकन

उचलली. दोघांचीही खात्री झाली. दोघंही लगबगीनं आत आले. साखळी स्वच्छ धुऊन त्यांनी देवासमोर ठेवली. एवढ्या लखलखीत सोन्याच्या साखळीकडं पाहूनही ते प्रथमच निर्विकार होते. त्यांचं लक्ष,देव्हाऱ्यातल्या पितळी देवांकडं होतं. रावसाहेबांच्या मनात क्षणभर आलं, आता पुढच्या वर्षीपासून हा सत्यनारायणाचा बडेजाव नको, आरास नको, तोंडपुजे लोक नकोत, खोटी प्रतिष्ठा नको, ती पूजाही नको, ते पुजारीही नको..

'थांब. ते बाकीचं नको, हे ठीक आहे. चार लोकंही मनापासून येऊ देत. तुझीतरी ही प्रवृत्ती बरोबर आहे का? तू परीक्षा देऊन लागला नाहीस, लक्षात आहे? ओळखीनं, कामसू, गरजू, चांगला मुलगा, म्हणून तुला घेता आलं. त्यांनी सचोटीनं राहा, सुखात राहशील सांगितलं होतं ना? खूप वर्षं पाळलं. पण संगतीनं आणि लोभानं विनाश होत चालला होता. तो आता निर्धारानं थांबला. गुरुजींचं तरी काय आहे? मुळात, सत्त्वशील आहेत ते. कुठंतरी लोभाच्या संगतीनं पळायला लागले. पण पुण्याईनं थांबवून, मळलेलं चित्त धुऊन घेतलं त्यांचं! त्याची आठवण राहण्यासाठी त्यांनाही मनापासून पूजेची सेवा करू देत आणि तुम्हीही शुद्ध दक्षिणा द्या. आले पहा ते. मी निघालो!'

रावसाहेबांनी बाहेर येऊन पाहिलं. गुरुजी खरोखरच दारात उभे होते. त्यांचा चेहरा नेहमीपेक्षा प्रसन्न होता. सत्त्वाचं तेज पुन्हा झळकत होतं. रावसाहेबांनी हात जोडून त्यांना आत बोलावलं. या उभयतांनी त्यांना वाकून नमस्कार केला. तिघंही जाऊन देवांच्या खोलीत बसले. रावसाहेब काही बोलायच्या आतच गुरुजी म्हणाले,'सारी दक्षिणा आणि सारे जमलेले पैसे देवळात ठेवून आलो. बाकीच्या कामांची व्यवस्था लावली. शांत चित्तानं, देवासमोर

क्षमापूर्वक शुद्ध चित्तासाठी अनुष्ठान केलं. आपले संबंध आजचे नाहीत, जिव्हाळ्याचे आहेत, वर्षांनुवर्षांचे आहेत. पुढच्या वर्षीपासून मला पूजा होणार नाही.'

रावसाहेब म्हणाले,'पूजा होणार!ती तुम्हीच करणार आणि आपल्या देवांपुरती होणार.'

'मी दक्षिणा घेणार नाही.' गुरुजी.

'थांबा. आपल्याला निर्धारानं नारायणापर्यंतचा प्रवास बरोबर करायचा आहे. दोघंही वर्षभर सत्य सांभाळा आणि रावसाहेब, प्रतीक म्हणून एक दिवस तुम्ही पूजा करा आणि गुरुजी, तुम्ही सत्याचा मान म्हणून एक दिवस फक्त पूजेची दक्षिणा घ्या!!'

तिघांनीही डोळे मिटलेले होते. आणि होत होतं ते दिपवून टाकणारं सत्यरूप नारायणाचं दर्शन!

**

रंगराव हॉस्पिटलच्या वेटिंगरूममध्ये अस्वस्थपणे येरझाऱ्या घालीत होते. मध्येच ते आयसीयूच्या दरवाजाच्या काचेतून आत डोकावून पाहात. त्यांचा तरुण मुलगा कॉटवर निपचित पडलेला त्यांना दिसला. बाजूला लावलेल्या सलाईनच्या स्टँडवरून येणाऱ्या नळ्या, ठिबकणारं पाणी, आत इतर ठिकाणी असलेले गंभीर पेशंट. वेळोवेळी सगळीकडं होणाऱ्या मॉनिटर्सच्या हालचाली, आवाज, मधूनच एखाद्या कॉटवर होणारी धावपळ, थोड्या ताणाखाली आत ये-जा करणारे डॉक्टर्स.

मुलाला इथं ॲडमिट करण्याची ही काही पहिली वेळ नव्हती. पहिल्यांदा त्याला घरी त्रास झाला, तेव्हा दातखीळ बसली असेल, चक्कर असेल, असं म्हणत गावाकडचे उपचार झाले. ते झाल्यावर थकवा येई. पुन्हा त्रास होई, थोडा थकवासुद्धा येई. पण तो

नॉर्मल असे, नेहमीसारखा हिंडू फिरू लागे. त्यामुळं त्यांनी त्याची फार काळजी घेतली नाही. शेतीच्या कामापुढं त्यांना वेळही नसे.

पण जशी त्याची शाळेची इयत्ता पुढं जाऊ लागली, तसं मात्र मुलाच्या दुखण्याचं प्रमाण वाढलं. प्रमाण वाढल्यावर, पूर्वीसारखी शक्ती भरून येईना. मग अशक्तपणा वाढायला लागला. लहानपणच्या त्या गुटगुटीत मुलाकडं, बघताना एकेदिवशी त्यांना हे फार जाणवलं.

त्यांचं स्वतःचं शिक्षण बेतास बात. पण व्यवहाराला फार चतुर. 'एक फूट लाकडातून पाच फूट ढलपी काढणारे' म्हणून त्यांचा लौकिक होता. त्यामुळं लवकर समज आली. पुढंही त्यांची बऱ्यापैकी स्वप्नं होती. या एकुलत्या एक मुलाचं सोनंच करून टाकायचा त्यांचा विचार होता.

'सोनं नाही, माती होईल! तीही सरळ नाही होणार!'

त्यांच्या आठवणीत ते विचार करीत कुठं गेले असते, कुणास ठाऊक! पण हे कोण बोललं? म्हणून येरझाऱ्या घालताना थबकून त्यांनी आजूबाजूला पाहिलं.

गर्दी होती. पण, माणसं आपापल्या खुर्च्यांवर फायली घेऊन चिंतातुर होऊन बसली होती. कुणाची कुजबुजत ये-जा सुरू होती. त्यांनी खात्री करून घेतली. आपल्या मनात हे सारखे विचार. त्यामुळं हा भास झाला. भासच तो. येरझाऱ्या सुरू करतात, तोवर त्यांना पुन्हा ऐकू आलं.

'भास? भास नाही. खरं आहे! बघायचंय?'

आता मात्र ते दचकून थांबले. इकडंतिकडं कोण नाही याची खात्री होतीच. त्यातल्या 'बघायचंय?..'या शब्दातल्या ठामपणाला ते खरंतर घाबरले होते. कसलंही काम निडरपणे करणारा माणूस. पण

दचकला. त्यांनी उभ्याउभ्याच डोळे मिटले. काय बघावं लागेल, या कल्पनेनं थोडं सैरभैर होऊन त्यांनी इकडंतिकडं बघितलं. आजूबाजूचं वातावरण तसंच होतं. क्षणार्धात, त्यांच्या डोक्यात वीज चमकावी तसं झालं. ते झपझप आयसीयूच्या दरवाज्याच्या काचेजवळ गेले. मुलाला पुन्हा जोरात आकडी आलेली दिसली.

डॉक्टरांच्या, स्टाफच्या भराभर हालचाली सुरू होत्या. ती वेळ निभावून नेण्याचे त्यांचे आटोकाट प्रयत्न चालले होते. गावाकडच्या मांत्रिकानं सांगितलेल्या बाधा - करणीपासून अनेक वैद्य, डॉक्टर यांनी सांगितलेल्या वेगवेगळ्या निदानावरून, ते शेवटी आकडी येण्यावर थांबलं होतं. ते आयुष्यात खूप वर गेले होते. पण त्या प्रत्येक वेळी, त्याच्या होणाऱ्या हालांनी, त्यांना त्यापेक्षा जास्त खाली आणलं होतं, खचवलं होतं. ते तसे धीराचे. मागं पंढरीच्या वारीची पुण्याई. पण, ती टिकवता आली नाही. अधिक पीक-पाणी, अधिक फायद्यात धंद्याला जोडधंदा, सोसायटीला जोडसोसायटी, मोठ्यांशी प्रतिष्ठेचे संबंध, व्यापातून वेळ नाही, म्हणून वारी चुकली ती चुकलीच. हे आज आपल्याला काय आठवायला लागलं,या विचारात ते पडले होते.

'वाडवडिलांनी अतिकष्टाच्या शेतीतून पोटाला चिमटा काढून बसवलेल्या लक्ष्मी-नारायणाच्या देवळाच्या चार प्रशस्त पायऱ्या, तुम्हाला दाखवायला उपयोगी पडतात की नाही, तुमची पुण्याई आहे म्हणून..' आवाज आला.

आता मात्र रंगराव खुर्चीत बसले.

'पायरीपुढं तुमच्या पिढीत कबूल केलेला सभामंडप? पैशाची नड सांगायची नाही. मगाशी जाऊन, बिलाच्या डिपार्टमेंटमधला आकडा बघितलाय ना? डिपॉझिट भरूनसुद्धा लाखात पुढं

सरकतोयच अजून. भरणार ना? वेळेचंही बोलू नका. आधी किती वेळ यात गेला आणि आता तर आठवडाभर मुक्काम पडलाय की नाही?'

रंगरावांना सगळ्या कबुल्या, सगळे शब्द आठवले. इतकी बारीक माहिती गावाला नव्हतीच, पण त्यांच्यासुद्धा लक्षात नव्हती. तसे ते धीराचे होते. चातुर्यालाही काही कमी नव्हते. पण, हे काम काही औरच होतं. ते माणसाच्या आटोक्यातलं नाही, हे लक्षात यायला त्यांना वेळ लागला नाही. ऐकत होते, ते सगळं खरंच होतं. त्यांच्या लक्षात आलं, असंच ऐकत बसलो, तर बरंच ऐकायला लागेल. कारण, त्यांनी कायकाय करून ठेवलं ते, त्यांना वाटलं, देवालाही कळणं कठीण आहे. त्यापेक्षा, आपलं हात जोडून मार्ग विचारावा, चालावा हे बरं.

ते एवढे बुद्धिमान. हिकमती. कसल्याही अडचणीतून भलाबुरा मार्ग काढून दाखवणारे. पण त्यांच्या लक्षात आलं, इथं हात जोडायचंही अवघड आहे. कुणासमोर हात जोडणार? बोलणार कुणाशी? गावचं लक्ष्मी-नारायणाचं देऊळ थोडंच आहे! भराभरा जाऊन टोपी काढून उंबऱ्यावर डोकं तरी ठेवलं असतं. इथला मार्ग मात्र सापडेना. मती गुंग झाली. त्याक्षणी त्यांना मुलाची काळजी समोर आली नाही, बिलाची चिंता वाटली नाही, गावाकडची कामं आठवली नाहीत..! फक्त मार्ग!

'देव सत्य आहे. तो कुठंही आहे, इथंही आहे. असत्याला ठिकाण असतं,म्हणून मार्ग असतो. तो दाखवता येतो. सत्याला त्याची गरज नाही. सत्यानं राहायचं की नाही ठरवा!'

'हे सगळं इतकं कळलं नाही. पण सत्यानं राहायचं ठरलं. नफा होवो, नुकसान होवो, देव आपला होवो! भले कष्ट असोत,

नुकसानही होवो, पण सुरुवात काय?'

'करायची ठरली?' आवाज आला.

'ठरली म्हणजे ठरली! अगदी कष्ट, नुकसान असलं तरी ठरली!' आता रंगराव ठाम होते.

'छान. चांगलं आहे. एक लक्षात ठेवा, सत्यात कष्ट आहेत,सबुरी आहे, धीर आहे पण नुकसान नाहीच, आनंद आहे! असत्यात तर सगळा घोटाळा आहे. दिसतो नफा, होतं नुकसान. होतं पटकन पण टिकत नाही. पीक भरपूर पण बाजारभाव पडतात!..'

'खरं आहे. खरं आहे.' रंगराव.

'आधी आजचं बघूया. मुलाला आकडीचा आजार लागलाय. निदान लागत नाही, मार्ग निघत नाही, पैशापरी पैसा जातोय. शेवटी कदाचित, मुलगाही हाती लागणार नाही. त्याचा आजार आकडीचा नाही, आकड्याचा आहे..!'

रंगराव स्तंभित झाले होते, चक्रावले होते. म्हणाले, 'म्हणजे मी नाही समजलो?' त्यांच्या मनात आलं, आपण तर कुठल्या सट्ट्याच्या,शेअरच्या,पैशाच्या बाजारात नाही.

'नीट विचार करा. पिकाचं उत्पन्न भरपूर आहे ना? पाण्याला कमी नाही ना? मोटरचं बिलं भरता का तेवढं?'

रंगरावांच्या डोक्यात विजेपेक्षा जास्त प्रकाश पडला.

'हां, आलं लक्षात. हा तो आकडा आहे तर! विजेवर पाणी भरपूर मिळालं. पण, बिलं नाही पडली कधी. हे खरं आहे. तेवढ्यानं एवढं होईल?' रंगराव मनात येईल तसं बोलत गेले.

'तेवढ्यानं? सरकारनं एवढी सोय केली, उत्पादनाचा खर्च केला, पण कर तर राहू द्या, खर्चसुद्धा सरकारला जमा होत नाही. कुठलंही सरकार शेवटी आपलंच आहे. आपण तरी त्याला तोट्यात

जायला लावू नये. त्यामुळं, ही बिलाची रक्कम तेवढी आहेच, पण त्यापेक्षा जास्त आहे. असत्याला वाटा असतात, वाटसरूही खूप असतात. तुम्ही ही विद्या किती लोकांना शिकवली? त्यातली नुकसानीही यात आहे,तीही अधिभार आणि दंडासह!'

'पण त्यानं थांबेल हे दुष्टचक्र? अर्थात, असं म्हणणं चुकीचं आहे..!'

'हे बरोबर आहे. झालं ते नुकसान झालंच. हॉस्पिटलनी काम केलेलं आहे. झालेल्या कामाचं बिल रास्त आहे, ते द्यावंच लागेल. तुम्हाला सद्‌बुद्धी झाली. ती टिकवलीत, तर मात्र, इथून पुढं नाही नुकसान होणार! पाहायचं असेल, तर इथं कुणाला तरी दुसऱ्याला बसवा. गावी जावा. आकडा काढून टाका, नष्ट करा. पुढं जमेल त्याला सांगा. लक्ष्मी-नारायणाला जा. वर्षाच्या आत मंडप होईल आणि या उद्या परत इथं!'

रंगरावांचा निर्धार पक्का होता. तसंच्या तसं ते ताडकन उठले. त्यांनी मनातल्या मनात नमस्कार केला. 'कृपा असू दे. बळ द्या..!'

रंगरावांनी दवाखान्याच्या परिसरात बाहेर कट्ट्यावर बसलेल्या त्यांच्या भाच्याला हाक मारली. त्याला सांगितलं, 'गावाकडं जरा अर्जंट काम आहे, जाऊन येतो. कदाचित, दिवसभर लागेल. उद्या रात्रीपर्यंत येतो, नाहीतर परवा नक्की.'

तो म्हणाला,'मामा, काळजी करू नका. मी काय इथं शहरातच राहतो. घरदार आहे. काही लागलं-सवरलं तरी बघतो. तुम्ही येईपर्यंत नक्की हजर आहे. तुम्ही बिनधास्त जा.'

त्यांनी रूममध्ये आत पाहिलं. आता मुलगा शांत झोपला होता. तिथली धावपळ थांबली होती. मग रंगराव संबंधित

डॉक्टरांना भेटले. डॉक्टरांच्या चेहऱ्यावर अजूनही तशी काळजीच होती. रंगरावांनी एक दिवस जाऊन येत असल्याची कल्पना दिली. डॉक्टर म्हणाले,'तुम्ही जाऊन यायला काहीच हरकत नाही. तसं आत्ताचं प्रमाण वाढलेलं आहे, त्रास वारंवार होतो आहे. पण आम्ही प्रयत्नांची शिकस्त करतोय!'

आजाराची अशी परिस्थिती ऐकूनही, रंगरावांना आता त्यामानानं चिंता वाटली नाही. त्यांचा पाय घोटाळला नाही. ते तडक गावाकडं निघून गेले.

घरी गेल्यावर, जरा स्थिरस्थावर झाल्यावर, त्यांनी मुलाच्या कंडिशनची, उपचारांची चर्चा केली. बाकीचा विषय कसा सांगावा, याबद्दल मात्र ते थोडे चिंतेत होते. तेवढ्यात, त्यांची पत्नी धाडस करून म्हणाली,'आत्ता एवढी काळजी समोर आहे, खर्च आहेत, बाळाच्या जिवाची चिंता आहे. पण मला वाटतं,'ते काय नशिबात असेल ते होईल. आपण देवाचा सभामंडप करावा..!' त्यांनी धाडसानं वाक्य पुरं केलं.

रंगराव उद्गारले,'करावं म्हणजे काय, करायचंच! आपण आधीच शब्द दिलाय. पण इतक्या वर्षांत आत्ता कुठनं हे तुझ्या डोक्यात आलं? या आजारपणामुळं का?..' त्यांनी उत्सुकतेनं विचारलं.

पत्नी म्हणाली,'तुमचा कदाचित विश्वास बसणार नाही. पण या आजाराशी नाही संबंध! मला ते आठवण झाल्यासारखं ऐकू आलं,'तेवढं सभामंडपाचं बघा!' तितक्यात तुम्ही अचानक आलात, म्हणून मी लगेच सांगून टाकलं.'

'कमाल आहे, पण छान आहे! बाकी बऱ्याच गोष्टी मलाही ऐकू आल्यात. ते सगळं करून बोलतो..' म्हणत रंगराव तसेच

अंधारात आपल्या एक-दोन दोस्तांना हाळी देत रानाकडं निघून गेले. सकाळ सकाळी भाच्याचा फोन आला. 'मामा, निश्चिंत राहा. गेल्या दहा-पंधरा तासांत त्याला अजिबात त्रास नाही. इतर औषधपाणीही कमी आहे. तो फ्रेश आहे.'

आता त्यांनी घरात सगळी कल्पना दिली. गुरुजींना गाठलं. रंगरावांना आता सात्त्विक उत्साह चढला होता. त्यांनी ठरवलं, वेळ-काळ अनुकूल असेल, तर आज सभामंडपाचा मुहूर्तच करायचा. रात्री, सकाळी त्यांचं बाकीच्या गावकऱ्यांशी बोलणं झालंच होतं. वाईटाला बळ असतं पण चांगल्याला नसतं, असं थोडंच आहे! गुरुजी म्हणाले,'दिवस उत्तम आहे. फक्त मुहूर्त संध्याकाळचा आहे.' ते उलट चांगलंच होतं. थोडा तयारीला वेळ मिळाला.

गावच्या भाविक भक्तांनासुद्धा आनंद झाला. मुहूर्त झाल्यावर, रंगरावांनी ग्रामस्थांना चहापाणी ठेवलं होतं. त्यापूर्वी, त्यांनी देवाला खणखणीत प्रार्थना केली. 'सभामंडपाला वर्ष नको देवा, तीन महिन्यांत होऊ दे. आषाढी तीन महिन्यावर आली. त्याच्या आत पुरं होऊ दे..'

तेवढ्यात आवाज आला. 'आणि वडलार्जित वारी? जोरानं गेलात, तर एक दिवसात पोचता. जाऊन येऊन तीन दिवसांत होईल..!' आवाज आला.

प्रार्थना करताना थांबलेले रंगराव देवाला आणि ग्रामस्थांना हात जोडून म्हणाले,'आणि यावर्षीपासून घरची वारी पुन्हा सुरू व्हावी, असं वाटतं! गावकऱ्यांचं सहकार्य..' सगळीकडून झालेल्या 'विठ्ठल विठ्ठल विठ्ठल!'च्या गजरात त्यांचं वाक्य कुठं विरून गेलं, तेही कळलं नाही. गावच्या म्हाताऱ्या-कोताऱ्यांपासून सर्वांना, अनेक वर्षं वाट बघत असलेला क्षण,चहापाण्यापेक्षा आनंद देऊन

गेला.

रात्री पुन्हा भाच्याचा फोन आला. तो म्हणाला,'माझी डॉक्टरांचीही भेट झाली. ते म्हणाले,आमचा विश्वास बसत नाही, एवढी प्रगती आहे. उद्या आपण त्याला सोडूसुद्धा, म्हणत भाच्यानं सांगितलं, मग त्याला न्यायच्या तयारीनंच या उद्या..'

तिकडं रावसाहेब आणि इकडं रंगराव, आणि अशा अनेक भाग्यवंतांच्या घरांत एकच चर्चा होती. त्यांनी मनोमन विचारलं,'आमचा अनुभव सत्य आहे. मार्ग सापडला. पण हा आवाज, भ्रम, अंधश्रद्धा तर नाही?'

'नाही! तो शुद्ध सत्याचा-देवाचा आवाज आहे.

अंधश्रद्धेतला तर्क मानवी आहे, दुबळा आहे. त्यानं भ्रम, असत्य यांचा एकवेळ निकाल करता येईल. पण सत्य, शुद्ध, शाश्वत सार्वत्रिक आहे. असत्याच्या गदारोळात, सत्याचा आवाज तुम्हाला ऐकू येईनासा झाला होता. तसंच बऱ्याच जगाचं होतं. म्हणून अनेकदा, असत्यच सत्य वाटायला लागतं. जिंकून जातं. पण ते तात्पुरतं असतं. सारखं बदलत असतं. आपण मनाच्या आधीन आहोत, तोवर असत्य आणि अंधश्रद्धा राहील. खरा प्रकाश येत नाही, पूर्ण सत्याचं निःसंशय आकलन होत नाही, तोपर्यंत ही आंधळी कोशिंबीर चालूच राहणार.'

'सत्याचा आवाज तुमच्या अंतरंगातला आहे, एकवेळ ऐकू येणार नाही, कमी ऐकू येईल, स्पष्ट ऐकू येईल. पण तो कधी भास, अंधश्रद्धा, भ्रम - समजू नका. सत्य एकच आहे, सर्वांना समान आहे, सर्वांचं हित व्हावं, यासाठी त्याचं सर्वांच्यावर प्रेम आहे. म्हणून तुम्ही अनुभवलं असेल, तुम्ही ऐकलेल्या सत्याचा आवाजातलं काहीच खोटं ठरलं नाही, ठरणारही नाही..!'

'मग या पूजा, देवळं, वाऱ्या?'

'या असत्याच्या अंधारात, प्रकाशाची ओळख देणाऱ्या, महत्त्व समजावून देणाऱ्या आणि ओढ लावणाऱ्या, त्या मोलाच्या पणत्या आणि दिवे आहेत. पण, त्यात सत्याचा प्रकाश टिकून आहे तोवर! जिथं कुठं सत्कर्मांचा, पुण्याईचा अंश आहे, ओढ आहे, श्रद्धा आहे, तिथं कुठंही तो ऐकू येतो. ऐकून निर्धारानं चालत राहिलं,तर प्रत्येकाची पावलं,त्याला देवाच्या - आनंदाच्या पंढरीत कायमचं नेतील! माणसाला 'आनंदरूप' होऊन जगायचं असतं, 'आनंदरूप' होऊन जायचं असतं. देवाला तरी माणसाकडून यापेक्षा मोठी अपेक्षाच नाही!!'

***

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची
(आता डिजिटल स्वरूपात)

१. **ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी** : श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

२. **हरिपाठपराग :** श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील काही जीवनसूत्रांचे सुबोध विवरण

३. **दर्शन :** आजच्या काळाचे अंतर्मुख करणारे दर्शन घडवणाऱ्या नव्या बोधकथा

४. **कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट :** कर्तव्य निश्चितीसाठी सविस्तर मार्गदर्शन, शंकासमाधानासह

५. **साधनपदावली :** येथे अभ्यास,भजन व चिंतनासाठी घेतली जाणारी निवडक साधनपदे

६. **जपसंकल्प : स्वरूप व पद्धती :** जपाच्या संकल्पांसंबंधी प्रश्नोत्तररूपाने सुबोध, उपयुक्त माहिती

७. **अभंगसाधना :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या अभंगांचे साधनदृष्ट्या विवेचन

८. **जाग :** आनंदमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

९. **जीवनजिज्ञासा** : जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा सुबोध परिचय

१०. **विचारविश्वाची ओळख :** आपल्या विचारांच्या विश्वाची सर्वांना उपयोगी ओळख

११. **चैतन्यचिंतन :** श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या काही बोधवचनांचे सुगम विवरण

१२. **किमया** : प्रकाशमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

१३. **प्रसादकण** : श्री तुकोबांचे नित्योपयोगी चोवीस अभंग व त्यांचे निरूपण

१४. **ठेवा** : उपनिषदांतल्या जीवनदृष्टीचे सुबोध व आगळे विवेचन

१५. **संतबोध : भाग १ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१६. **संतबोध : भाग २** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१७. **संतबोध : भाग ३** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१८. **वृत्त्यंतरप्रकाश** : खऱ्या परमार्थाचा श्रीगणेशा करण्यासाठी मोलाची मदत

१९. **नाम** : नामाच्या जिज्ञासूंसाठी सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

२०. **श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली** : सहस्रनामांतील निवडक नामांतून उलगडणारी जीवनशैली

२१. **चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)** : चिंतनास उपयुक्त अशी एकूण ३६६ बोधवचने

२२. **उपासनेची नोंदवही :** विविध व्यक्तिगत उपासना संकल्पांची पॉकेट साईज नोंदवही

२३. **उत्तरायण - भाग १ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२४. **शोध :** जिज्ञासू साधकांसाठी जे. कृष्णमूर्तींच्या काही विचारांचा सोपा अभ्यास

२५. **दिशा :** वास्तवावर विचार करण्याच्या काही उपयुक्त कथारूप दिशा

२६. **उत्तरायण - भाग २ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२७. **मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी :** मुलांसाठी उद्‌बोधक व रंजक गोष्टी - मोठ्यांनाही उपयोगी पडतील अशा

२८. **बासरी :** जीवनसंगीत सुरेल करण्यासाठी काही कथामय बोध

२९. **उपासना :** खऱ्या उपासनेची गरज, स्वरूप, शंका यांचा सोपा उलगडा

३०. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी :** श्री ज्ञानेश्वरी बाराव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

३१. **कृपापदावली भाग : १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३२. **कृपापदावली भाग : २ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३३. **साधनपदावली भाग १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

३४. **सारविस्तार भाग : १ :** चिंतनक्षण वचन क्र. एक ते आठ वरील ९ निरूपणे

३५. **साधनप्रेरणा :** नित्योपासनेसाठी संतछायेतील संतप्रतिमा व नमनमाला यांचे डेस्कटॉप कॅलेंडररूपाने दर्शन, गुरुपदपप्रतीक व आरत्यांसह

३६. **मेरी यात्रा (हिंदी) :** हिंदी कविताओं में निबद्ध साधन-यात्रा

३७. बोधपाठ : आधुनिक नित्यपाठ, २७ अभंग, विवरण, विश्वात्मकाच्या आरतीसह

३८. एकाध्यायी विचारगीता : (विवरणासह) : आदर्श मानवी जीवनासाठी आचरणीय विचारांचे मोजके सार

३९. सृष्टिसंदेश : (विवरणासह) : जीवनाला विधायक दिशा देणारे २७ अभंग सृष्टीच्या आरतीसह

४०. गुरुतत्त्वतरंगिणी : गुरुतत्त्वाच्या कार्याचे तीन अध्यायांत सुबोध श्लोकबद्ध विवरण

४१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत

४२. नाम (इंग्रजी आवृत्ती) : The Simplest Path For Spiritual Liberation

४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके) : डॉ. पेठे यांची चिंतनास उपयुक्त अशी बोधवचने

५५. शिदोरी : व्यक्तिगत, सामाजिक व पारमार्थिक हितासाठी विचारमंथन

५६. विचारविसावा : विसावा देणारी विचारांची विद्या

५७. सारविस्तार भाग २ : चिंतनक्षण वचन क्र. नऊ ते तेरा वरील ७ निरूपणे

५८. महाराजांची शाळा : श्री गोंदवलेकर महाराज यांच्या कल्याणकारी उपदेशाचं लहान थोर सर्वांना उपयोगी ठरू शकणारं सोपं विवरण

५९. साधनपदावली भाग २ : भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

६०. आरतीपुष्पमाला : डॉ. सुहास पेठे रचित विविध नवीन आरत्या

६१. विनवणीची वाणी : चौदा आर्त अभंग प्रास्ताविक व निवेदनांसह

६२. श्रद्धेची पहाट : खऱ्या सुखाचा वास्तवाधार कथारूप बोध..

६३. उपासनामाला : येथे केल्या जाणाऱ्या विविध उपासना

६४. पावनपथ : श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग

६५. अनुभवपुष्पे - भाग १ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

६६. कृतज्ञतामार्ग : कृतज्ञता या गरजेच्या गुणाचं सार्वत्रिक महत्त्व, जन्मभर व मृत्यूनंतर आचरणासाठी कालोचित, सोप्या, सार्वत्रिक कृती, सर्वांना स्वतंत्रपणे सहभागी होता येण्यासारखे मराठी मंत्र

६७. **ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात :** आजच्या जीवनासाठी ज्ञानेश्वरीची सोपी ओळख

६८. **श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती)**
श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

६९. **संतबोध : भाग ४ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

७०. **श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार :** मूळ श्लोक मराठी समश्लोकीसह

७१. **उत्तरायण -भाग ३ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

७२. **अनुभवपुष्पे - भाग २ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७३. **श्रद्धा :** श्रद्धा या विषयावरची सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

७४. **अनुभवपुष्पे - भाग ३ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७५. **अर्घ्य :** ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून केलेल्या प्रातिनिधिक कृती, काही कथांच्या रूपानं

७६. **जीवनचिंतन :** दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या गोष्टींतला मोठा बोध

७७. **स्वास्थ्यसंवाद :** मनःस्वास्थ्यासाठी सर्वांना उपयुक्त, सोपा सुसंवाद

७८. **वचनांजली भाग १ :** श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

७९. **अक्षरायण :** आनंदप्राप्तीसाठी 'अक्षर' चिंतनसूत्रं

८०. **वचनांजली भाग २ :** श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

८१. **भावगीता :** श्रीमद्भगवद्गीतेचा मराठी समश्लोकी भावानुवाद

***

अर्घ्य

'..ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून केलेल्या अशा प्रातिनिधिक कृती म्हणजे अर्घ्यच आहेत. विद्येला निरपेक्ष विद्यादान, अन्नाला पक्ष्यांसाठी अन्नदान, वृक्षवल्लींना निरपेक्षपणे वाढवलेली रोपं, पाण्याला निर्मल-प्रवाहित ठेवणं, वायूचा संयमित वापर, त्याला प्रदूषणमुक्त ठेवणं, सूर्याचे नमस्कार, जमिनीच्या कशाही वापराबद्दल तिची रोज क्षमाप्रार्थना आणि भगवंताचं स्मरण - हे त्यांचे त्यांचे अर्घ्यच आहेत.. !'